Shri Wagheshwar Gramvikas Pratishthan's

# SHRI VASANTRAO PHARATE-PATIL ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, MANDAVGAN PHARATA

Tal. Shirur, Dist. Pune 412211 (MH) Tel : +91 (02137) 262222 Fax : +91 (02137) 262222 / 262999
Web : www.swgp.org.in Email ID : acscollege09@gmail.com



## COLLGE ANNUAL MAGAZINE 2019

# वाघेश्वर

श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित

# श्री वसंतराव फराटे-पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मु.पो.मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे ☎:(०२१३७) २६२२२२

# वाघेश्वर

## वार्षिक अंक - सन २०१८-१९

* संपादक *

प्राचार्य डॉ.तुकाराम सावंत

* कार्यकारी संपादक *

प्रा. रमेश अंबऋषी शितोळे

* संपादक मंडळ *

उपप्राचार्य प्रा.प्रविण कुरूमकर

प्रा. बाळासाहेब तावरे

प्रा. जयराम पवार

प्रा.कु. माधुरी घाडगे

प्रा.हनुमंत लांडगे

प्रा.सौ. सुरेखा देशमुख

प्रा.अनंत चव्हाण

प्रा.कु. अश्विनी शिंदे

प्रा. नवनाथ दिवेकर

# वार्षिक नियतकालिक २०१८-१९

## दि प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स नियम ८ फॉर्म ४ प्रमाणे आवश्यक माहिती



| | | |
|---|---|---|
| * प्रकाशन स्थळ | : | श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित<br>**श्री वसंतराव फराटे-पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**<br>मु.पो.मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे |
| * प्रकाशन काळ | : | **वार्षिक** |
| * प्रकाशक व संपादक | : | **प्राचार्य डॉ.तुकाराम सावंत**<br>**श्री वसंतराव फराटे-पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**<br>मु.पो.मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे |
| * कार्यकारी संपादक | : | **प्रा. रमेश अंबऋषी शितोळे** |
| * राष्ट्रीयत्व | : | **भारतीय** |
| * मालकी | : | **श्री वसंतराव फराटे-पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**<br>मु.पो.मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे |
| * मुद्रक | : | **सार्थक ऑफसेट, काष्टी** |

सदर अंकात व्यक्त करण्यात आलेल्या साहित्यातील मतांशी संपादक मंडळ व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

मी प्राचार्य डॉ.तुकाराम सावंत असे जाहिर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

## आमचे आधारस्तंभ



# मा.श्री. वसंतराव विनायकराव फराटे पाटील

# आमचे प्रेरणास्थान



मा.श्री. राजीव वसंतराव फराटे-पाटील (साहेब)
संस्थापक अध्यक्ष
श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण



मा.श्री. ज्ञानेश्वर वसंतराव फराटे-पाटील
संस्थापक उपाध्यक्ष
श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण



मा.सौ. मृणाल राजीव फराटे-पाटील
संस्थापक सचिव
श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण

# संपादक मंडळ



**प्रा.प्रविण कुरूमकर**
उपप्राचार्य



**प्रा.रमेश शितोळे**
कार्यकारी संपादक



**प्रा.बाळासाहेब तावरे**
संगणक शास्त्र विभाग



**प्रा.सौ. सुरेखा देशमुख**
मराठी विभाग



**प्रा. जयराम पवार**
भूगोल विभाग



**प्रा. अनंत चव्हाण**
ग्रंथपाल



**प्रा.कु. अश्विनी शिंदे**
वाणिज्य विभाग



**प्रा.कु. माधुरी घाडगे**
संगणक शास्त्र विभाग



**प्रा. नवनाथ दिवेकर**
वाणिज्य विभाग



**प्रा. हनुमंत लांडगे**
संगणक शास्त्र विभाग

## * क्षणचित्रे *



आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर मार्गदर्शन



आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर प्रात्यक्षिक



आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर प्रात्यक्षिक


आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर प्रात्यक्षिक



स्वच्छ भारत अभियानातंर्गत स्वच्छता रॅली


राष्ट्रीय सेवा योजना अंगर्तग रक्तदान शिबीराचे आयोजन

## * क्षणचित्रे *



**पदवीप्रदान** समारंभादरम्यान रॅली



**पदवीप्रदान** समारंभादरम्यान पदवी स्विकारताना



**पदवीप्रदान** समारंभादरम्यान पदवी स्विकारताना



**पदवीप्रदान** समारंभादरम्यान पदवी स्विकारताना



महाविद्यालयाच्या भित्ती पत्रकाचे उद्घाटन करताना
मा.सौ.मृनाल राजीव फराटे पाटील मॅडम



बेटी बचाओ-बेटी पढाओ अंतर्गत महाविद्यालयात
कन्या पुजन चे आयोजन

## ❊ क्षणचित्रे ❊



भूगोल दिनानिमित्त आयोजित पोस्टर प्रदर्शन प्रसंगी पाहणी करताना मेजर डॉ.मानसिंगराव गोडसे व भूगोल विभागप्रमुख प्रा.जयराम पवार



निरोप समारंभाप्रसंगी अब्रांहिम लिंकन यांचे 'मुख्याध्यापकास पत्र'ची आवृत्ती महाविद्यालयास भेट देताना.



राष्ट्रीय सेवा योजना **अंतर्गत** इनामगाव ता.शिरूर, जि.पुणे येथे स्वच्छता अभियान



निर्भय कन्या अभियान योजना युवती व आजचा समाज या व्याख्यान मालिकेचे आयोजन



निर्भय कन्या अभियान योजना युवती व आजचा समाज या व्याख्यान मालिकेचे आयोजन



माता पालक मेळावा दरम्यान महिला सबलीकरणावरील व्याखानाचे आयोजन

## ❊ क्षणचित्रे ❊



इनामगाव येथे योग शिबिराचे आयोजन



इनामगाव येथे योग शिबिराचे आयोजन



स्पर्धा परिक्षाविषयक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन
चाणक्य अ‍ॅकॅडेमीचे संचालकांचे स्वागत करताना



वाढदिवसाचा अवांतर खर्च वाचवून विद्यार्थ्यांव्दारे महाविद्यालयास थोर व्यक्तींच्या चरीत्र स्वरूपात पुस्तकांची भेट देताना.



रक्षाबंधनानिमित्त प्रजापती ब्रम्हकुमारी संस्थेमार्फत व्याख्यानाचे आयोजन



नवरात्री निमित्त रासदांडीया या कार्यक्रमाचे आयोजन

# हार्दिक अभिनंदन



महाविद्यालयाचा विद्यार्थी कु.दिनेश गुंड (एस.वाय.बी.ए.) या विद्यार्थ्याने सन २०१८-१९ या वर्षातील **खेड केशरी चषक** चषक हा किताब पटकवल्याबद्दल हार्दिक अभिनंदन

या विद्यार्थ्याचे सन २०१८-१९ या वर्षातील **आंतर विद्यापीठ** स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल..

या विद्यार्थ्याचे सन २०१८-१९ या वर्षातील **महाराष्ट्र कुस्ती लीग** साठी निवड झाल्याबद्दल..



महाविद्यालयाचा विद्यार्थी कु.शुभम जगताप (एस.वाय.बी.ए.) या विद्यार्थ्याने सन २०१८-१९ या वर्षातील **शिरूर केसरी** चषक हा किताब पटकवल्याबद्दल हार्दिक अभिनंदन



श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित

# श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मांडवगण फराटा, ता. शिरूर, जि. पुणे

## स्थानिक समिती / Local Committee

### Name of Board of Director of Authorised Organization as per Schedule 1 of Charitable Commissioner's Office

| Sr.No. | Name of the Member | Post |
|---|---|---|
| 1 | Shri. Rajiv Vasantrao Pharate Patil | Chairman |
| 2 | Dr. Sawant Tukaram Sarjerao (Principal) | Secretary |
| 3 | Shri. Pharate Pandit Malharrao | Member |
| 4 | Shri. Pharate Hement Shivaji | Member |
| 5 | Prof. Pitale Amol Pravin | Member |
| 6 | Prof. Taware Balasaheb Shivaji | Member |
| 7 | Shri. Nikat Navnath Bhagwat (Non-Teaching) | Member |

श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित

# श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि. पुणे



## शुभेच्छा संदेश...

**ग्रामीण भागातील तरुणांच्या पंखात बळ देणारे "वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान"**

सध्यांचं युग हे धकाधकीचं युग आहे.प्रत्येक जण जगाच्या धावण्याच्या गतीत वेगाने पळतो आहे.शहरांत उच्च शिक्षणाच्या चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध असतात परंतु ग्रामीण भागातील तरुणांचे काय ? त्यांना चांगलं दर्जेदार शिक्षण मिळावं यासाठी एका युवकाने स्वप्न पाहिलंही अन सत्यात उतरवलंही.राजीव पाटील फराटे असं त्या ध्येयवेडया तरुणाचे नाव...

शिरुर तालुका तसा दुष्काळी तालुका.त्यामुळे ना शिक्षणाची सोय,ना धड रस्त्यांची सोय.ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील मुला-मुलींचं नेहमी उच्च शिक्षणाचं स्वप्नं असायची पण चांगलं शिक्षण मिळवणं हे अत्यंत दुरापास्त.याच मुलांची शिक्षणाची ओढ संस्थेचे संस्थापक राजीव पाटील फराटे यांना स्वस्थ बसु देत नव्हती.ग्रामीण भागातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्दात्त हेतुने फराटे यांनी दुरदृष्टी ठेवुन मांडवगण फराटा गावातच गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्याचे ठरवत वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान च्या माध्यमातुन एकाच छताखाली नामदार श्री शरदचंद्रजी पवार पब्लिक स्कुल, श्री वसंतराव फराटे पाटील कला,वानिज्य,विज्ञान महाविद्यालय,श्री दादा पाटील फराटे कॉलेज ऑफ  बी. फार्मसी,फराटे पाटील कॉलेज ऑफ डी फार्मसी ची स्थापना करण्यात आली.ग्रामीण भागातील केजी पासुन ते एम.फार्मसी पर्यंतचे एकाच ठिकाणी चांगले दर्जेदार गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळवुन देण्याचे स्वप्न पुर्ण झाले होते तर शिरुर तालुक्यात प्रथमच खेड्यातील दुर्गम भागात सर्वच प्रकारचे शिक्षण मिळु लागल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले जात आहे.ग्रामीण भागातील ज्या मुलींना फार्मसी सारखे उच्च शिक्षण घ्यावे असे नेहमी वाटे परंतु परिस्थितीअभावी घेणे शक्य होत नव्हते अशा मुलींना ख-या अर्थाने ज्ञानाची कवाडे खुली करण्यात आली होती.

संस्था उभी करताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री राजीव पाटील फराटे यांना असंख्य संकटांचा सामना करावा लागला.ध्येय जितके मोठे तितके आव्हानही मोठे परंतु तरीही त्यांनी हार मानली नाही.ग्रामीण भागात प्रथमच अशा प्रकारचे शिक्षण अत्यंत माफक फीत मिळु लागल्याने संस्थेत शिरुर तालुक्यातीलच नव्हे तर इतर तालुक्यांसह पुण्या,मुंबईचे विद्यार्थी आज शिक्षण घेत आहेत.संस्था उभारणी करत असताना बी.बी.ए.,बी.सी.ए.,बी.सी.एस या तीन डिग्री अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली.परगावाहुन येथे शिक्षणासाठी येणा-या विद्यार्थ्यांसाठी सर्व सुविधांयुक्त स्वतंत्र वसतिगृह उभारण्यात आले.पुणे विद्यापीठानेही तांत्रिक बाबींचे मुल्यमापन "उत्कृष्ट" असा शेरा दिला.

संस्थेच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी विविध उपक्रम वर्षभर राबविले जातात.खेळाला उत्तेजन मिळावे यासाठी क्रिडा स्पर्धांचे आयोजन केले जाते.सामाजिक जाणिवेतुन प्रजासत्ताक दिनी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात सुमारे ३०० बाटल्या रक्तसंकलित करण्यात आले.विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्राविषयी माहिती व संधी मिळावी या हेतुने वेगवेगळ्या नामांकित कंपन्यांना क्षेत्रभेटीचे सातत्याने आयोजन केले जाते.मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळावी यासाठी महाविद्यालय सातत्याने आग्रही असते.इंग्रजी माध्यमातुन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा विकास घडावा यासाठी वाघेश्वर प्रतिष्ठान ने सुरु केलेल्या श्री शरदचंद्र पवार पब्लिक स्कुल ने अल्पावधीत शिक्षणाच्या कार्यात ठसा उमटवित सलग तीन वर्ष "ए" मानांकन मिळवले आहे. हे सर्व करत असताना शिक्षणानंतर लगेचच तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी "कॅम्पस इंटव्हयुव्ह" संस्थेच्या मार्फत आयोजन करण्यात आले त्यासही उत्सफुर्त प्रतिसाद मिळाला.या माध्यमातुन ७५% विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या.शैक्षणिक कार्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये आधात्मिक ज्ञानाची व सामर्थ्याची जाणीव होण्यासाठी अनेक तज्ज्ञांची वाख्याने तसेच धार्मिक कार्यक्रमांचेही संस्थेत आयोजन केले जाते.ज्येष्ठ समाजसेवक ह.भ.प. बंडातात्या कराडकर,माजी न्यायमुर्ती बी.जी.कोळसे पाटील,प्रसिद्ध व्याख्यात्या अपर्णाताई रामतिर्थकर यांचे विचार अन जवळुन अनुभण्याचा योग विद्यार्थ्यांना आला. उच्च शिक्षण घेत स्पर्धा परिक्षांची तयारी करणा-या विद्यार्थ्यांसाठी संस्थेत विनामुल्य अभ्यासिकेचीही व त्याचबरोबर सर्व प्रकारची पुस्तके मोफत उपलब्ध करुन देण्यात आले आहे.प्रतिवर्षी दोन विद्यार्थ्यांना संस्थेचे संस्थापक श्री राजीव पाटील फराटे हे उद्दात्त हेतुने गोर गरीब कुटुंबातील दोन होतकरु तरुणांना दत्तक घेत असुन त्यांचा स्पर्धा परिक्षांचा सर्व खर्च स्वत: संस्थेच्या माध्यमातुन करत आहे.

उद्दात्त हेतुने लावलेले रोपटे आज शिक्षणाचा वटवृक्ष म्हणुन शिरुर तालुक्यात ओळखला जात असुन या वटवृक्षाच्या छायेखाली शिक्षण घेउन बाहेर पडलेले होतकरु तरुण विठ्ठल उदमले हे आज उपजिल्हाधिकारी म्हणुन उच्च पदावर कार्यरत आहेत.हीच खरी सामाजिक कार्याची पावती आहे.वाघेश्वर ग्रामविकास संस्था उच्च दर्जाचे शिक्षण देण्यात अग्रस्थानी असताना संस्थेने राबविलेले तंबाखु व्यसन मुक्ती अभियानाचे पुणे विद्यापीठानेही कौतुक करत "गोल्ड मेडल" संस्थेस बहाल केले आहे.संपुर्ण विद्यापीठात "गोल्ड मेडल " मिळवलेले असेही एकमेव महाविद्यालय आहे.याच बरोबर वृक्षसंवर्धन,लेक वाचवा अभियान,महिला अत्याचाराविरोधात स्टॉप रॅगिंग चळवळ आदी समाजोपयोगी उपक्रम संस्थेबरोबर परिसरात राबविले जातात.या सर्व उपक्रमांना फराटे यांनी सातत्याने पाठबळ दिले आहे.शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक भावनेतुन संस्था राबवत असलेले उपक्रम हे वाखानन्याजोगे आहेत.संस्थेचा प्रगतीचा आलेख उंचावण्यासाठी सचिव मृणाल फराटे पाटील,संस्थेचे सर्व संचालक मंडळ,प्राचार्य,शिक्षक वृंद,शिक्षकेतर सदैव प्रयत्नशील असुन भविष्यातील ज्ञानाच्या कक्षा विस्तीर्ण करण्यासाठी श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित फराटे पाटील ग्रुप ऑफ इंन्स्टिट्युट नेहमीच अग्रस्थानी राहिल यात शंकाच नाही...



**सौ. मृणाल राजीव फराटे पाटील**
संस्थापक सचिव
श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण

श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित

# श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि. पुणे

## प्राचार्य मनोगत...



प्रिय विद्यार्थी मित्र हो !

शैक्षणिक वर्ष २०१८- २०१९ चा महाविद्यालयाचा 'वाघेश्वर' वार्षिक अंक आपल्या माहिती साठी देताना मनस्वी आनंद होत आहे

समृद्ध परंपरेने संपन्न असलेल्या श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान संस्थेने २००८ साली ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच समाजाचा शैक्षणिक व सांस्कृतिक स्तर उंचावण्याच्या उदात्त दृष्टीकोनातून श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली. महाविद्यालय विनाअनुदानित असताना सुद्धा गुणवत्ता व दर्जा या बाबत सतत जागृत असणाऱ्या व शिक्षण क्षेत्रात आपली एक स्वतंत्र प्रतिमा निर्माण करणाऱ्या संस्थेच्या मान्यवर पदाधिकार्यांनी भव्य सुसज्ज इमारत, समृद्ध ग्रंथालय , अद्ययावत प्रयोगशाळा , स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र या सर्व भौतिक सुविधा अल्प कालावधी मध्ये उपलब्ध करून दिल्या त्याबद्दल मान्यवर सर्व पदाधिकारी , विश्वस्त , कार्यकारी सदस्यांच्या ऋणात आम्ही आहोत.

उच्च शिक्षण देणे हे महाविद्यालयाचे आद्य कर्तव्य आहे. ज्ञानदानाबरोबर महाविद्यालयाने शैक्षणिक वर्षामध्ये केंद्रित व समाजोपयोगी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. विशेष व्याख्याने , वृक्षारोपण , हिवाळी श्रमसंस्कार शिबीर ,रक्तदान शिबीर, निर्भय कन्या अभियान , आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा , युवतींच्या आरोग्यविषयक समस्या व हिमोग्लोबिन

तपासणी शिबीर , माता पालक मेळावा  व कन्या पूजन यासारख्या उपक्रमांचा विशेष उल्लेख करावा लागेल. त्याबरोबरच विविध उपक्रमांच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ञांनी दिलेल्या भेटी व व्याख्याने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी निश्चितच लाभदायक ठरली. ग्रामीण भागातील विद्यार्थी अत्यल्प सुविधांमध्ये सुद्धा अंगीभूत गुणांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये यश संपादित करू शकतात . हे आमच्या विद्यार्थ्यांनी वेळोवेळी प्राप्त केलेल्या यशावरून सिद्ध होते. दिनेश गुंड या विद्यार्थ्याने कुस्ती क्रीडा प्रकारात 'खेड केशरी चषक' हा किताब पटकाविला तसेच त्याची 'महाराष्ट्र कुस्ती लीग' साठी निवड झाली. त्याबरोबरच शुभम जगताप या विद्यार्थ्याने'शिरूर केसरी' हा किताब पटकाविला.

'वाघेश्वर' चा अंक साकारण्यासाठी संस्थेच्या मान्यवर पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन , संपादक , प्राध्यापक , प्रशासकीय अधिकारी , शिक्षकेत्तर कर्मचारी , विद्यार्थी, पालकांचा सक्रीय सहभाग व योगदान विसरता येणार नाही. 'वाघेश्वर' च्या अनुषंगाने  आपल्या रचनात्मक व विधायक सूचनांचे सहर्ष स्वागत.

**डॉ.तुकाराम सावंत**
प्राचार्य



श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित

# श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मांडवगण फराटा, ता. शिरूर, जि. पुणे



## संपादकीय...

२१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर संपूर्ण जग जे विविध अशा उन्नत आणि प्रगत अवस्थेत असतानाही शिक्षणाची असणारी प्रचंड गरज आणि प्रारंभिक आवश्यकता टोकाची आहे आणि नाकारता येत नाही. पालकांची सकारात्मक भूमिका या संदर्भामध्ये प्रकर्षाने पाहायला मिळते. आजचा पालक कितीही प्रगत असला तरी तो शिक्षणाच्या बाबतीत सूज्ञ आहे आणि आपला मुलगा किंवा मुलगी चांगल्या शाळेत/कॉलेजमध्ये चांगल्या पद्धतीने शिकावी ही त्यांची भूमिका आहे. त्यांची हीच भूमिका पाहता चांगल्या शाळेचे/कॉलेजचे महत्व काय हे आपण आज अगदी सहजपणे सांगू शकतो आणि प्रत्येक परिसरामध्ये अशा प्रकारच्या सर्व सोयींनी युक्त आणि सुसज्ज अशा शाळा / कॉलेज असलेच पाहिजेत.

आजचा विद्यार्थी सुध्दा मग तो ग्रामीण, शहरी असो किंवा गरीब-श्रीमंत असो आपल्या स्वत:च्या करिअरशी संबंधित गंभीर सुजाण आणि भविष्याचा विचार करणारा आहे. त्यामुळे आजच्या विद्यार्थी व विद्यार्थीनींना शिक्षण देत असतांना आपणही तेवढे गंभीर सकारात्मक आणि समर्थ असलेच पाहिजे ही अपेक्षा नाकारता येत नाही. विद्यार्थींच्या अपेक्षा त्याच्या स्पर्धा परीक्षा व चांगल्या नोकरीकडे असलेला कल पाहता आपल्याला वाढलेल्या दिसतात आणि त्यानुसार प्राध्यापकांची गुणवत्ता ही सुधारलेली असली पाहिजे ही गोष्ट आपल्याला मान्य करावीच लागेल. आजकालच्या युगामध्ये प्राध्यापक काय देतो हे केवळ एवढेच महत्वाचे नाही तर तो कसे देतो किती प्रमाणात देतो आणि त्याचा काही सकारात्मक परिणाम आहे किंवा नाही हे देखील तपासणे महत्वाचे आहे.

शिक्षणाचे महत्व हे नेहमीच नाकारता येत नाही परंतु आजच्या घडीला कुठल्या क्षेत्रामध्ये वाव निश्चित आहे याचा शोध घेवूनच विद्यार्थी-विद्यार्थीनींनी त्यानुसार शाखा निवडून योग्य ते शिक्षण घेतले पाहिजे बाकी शुभेच्छा तर सर्वांच्या त्यांच्या पाठीशी असतात.

**प्रा.रमेश अंबऋषी शितोळे**
कार्यकारी संपादक



श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित

# श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मांडवगण फराटा, ता. शिरूर, जि. पुणे

## अभिनंदन

महाविद्यालयातील आदर्श दिनेश गुंड (एस.वाय.बी.ए.) या विद्यार्थ्याने सन २०१८-१९ या वर्षातील खेड केसरी चषक हा किताब पटकवल्याबद्दल **हार्दिक अभिनंदन !**



महाविद्यालयातील शुभम बाळासाहेब जगताप (एस.वाय.बी.ए.) या विद्यार्थ्याने सन २०१८-१९ या वर्षातील शिरूर केसरी चषक हा किताब पटकवल्याबद्दल **हार्दिक अभिनंदन !**



महाविद्यालयातील आदर्श दिनेश गुंड (एस.वाय.बी.ए.) या विद्यार्थ्याने महाराष्ट्र कुस्ती लीग या सामन्यासाठी निवड झाल्याबद्दल **हार्दिक अभिनंदन !**



महाविद्यालयातील (एस.वाय.बी.ए.) या वर्गातील गुड आदर्श दिनेश या विद्यार्थ्याने सन २०१८-१९ या वर्षातील आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल **हार्दिक अभिनंदन !**



श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित

# श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मांडवगण फराटा, ता. शिरूर, जि. पुणे

## महाविद्यालयातील विकास समिती / College Development Committee

| Name | Name in Marathi | Designation | Valid Upto |
|---|---|---|---|
| Mr. Rajiv Vasantrao Pharate Patil | श्री. राजीव वसंतराव फराटे पाटील | President | 30/04/2021 |
| Mrs. Mrunal Rajiv Pharate Patil | सौ. मृणाल राजीव फराटे पाटील | Nominee of Secretary Management | 30/04/2021 |
| Mr. Pharate Patil Dnyaneshwar Vasantrao | श्री.ज्ञानेश्वर वसंतराव फराटे पाटील | Local Members | 30/04/2021 |
| Mr. Pharate Patil Shardchandra Vasantrao | श्री.शरदचंद्र वसंतराव फराटे पाटील | Local Members | 30/04/2021 |
| Pharate Patil Pratap Vasantrao | श्री.प्रताप वसंतराव फराटे पाटील | Local Members | 30/04/2021 |
| Prof. Pitale Amol Pravin | प्रा. पितळे अमोल प्रविण | Head of Department | 30/04/2021 |
| Prof. Pawar Jayram Sunil | प्रा. पवार जयराम सुनिल | Teacher | 30/04/2021 |
| Prof. Diwate Rohidas Prakash | प्रा. दिवटे रोहिदास प्रकाश | Co-ordinor | 30/04/2021 |
| Mr. Navnath Bhagwat Nikat | श्री.नवनाथ भागवत निकत | Non Teaching Employees | 30/04/2021 |
| Prof. Ollala Priti Bhumesh | प्रा.ओलाला प्रिती भूमेश | Women Teacher | 30/04/2021 |
| Prof. Khandare Sachin Baburao | प्रा. खंदारे सचिन बाबूराव | Teacher | 30/04/2021 |
| Dr. Sawant Tukaram Sarjerao | डॉ. सावंत तुकाराम सर्जेराव | Principal | 30/04/2021 |

श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित

# श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मांडवगण फराटा, ता. शिरूर, जि. पुणे

## एक दृष्टीक्षेप निकालावर

| Class : B.A. | Total | Result | |
|---|---|---|---|
| F .Y | 102 | 75% | Total Class 69% |
| S.Y. | 87 | 43% | |
| T.Y. | 50 | 89% | |

| Class : B.Com | Total | Result | |
|---|---|---|---|
| F .Y | 120 | 71% | Total Class 76.66% |
| S.Y. | 119 | 71% | |
| T.Y. | 64 | 84% | |

| Class : B.C.S. (Com) | Total | Result | |
|---|---|---|---|
| F .Y | 27 | 83% | Total Class 83% |
| S.Y. | 24 | 88% | |
| T.Y. | 40 | 78% | |

| Class : B.B.A. (C.A.) | Total | Result | |
|---|---|---|---|
| F .Y | 52 | 55% | Total Class 48.33% |
| S.Y. | 16 | 46% | |
| T.Y. | 33 | 43% | |

| Class : B.B.A. | Total | Result | |
|---|---|---|---|
| F .Y | 76 | 52% | Total Class 48.33% |
| S.Y. | 31 | 41% | |
| T.Y. | 42 | 42% | |

## साहित्य...

# रामानुजन: एक अलौकिक गणितीय व्यक्तिमत्व

प्रा. पुष्पांजली काटे

आपल्याला कधी प्रश्न पडला आहे का ? जर एखाद्या संख्येला त्याच संख्येने भागले तर भागाकार एक येईल का ? नाही ना ? पण एसा प्रश्न वयाच्या पाचव्या वर्षी पडणारा आणि त्याचे ठामपणे उत्तर देणारा हा मुलगा होता तो म्हणजेच 'श्रीनिवास रामानुजन'

श्रीनिवास रामानुजन यांचा जन्म २२ डिसेंबर १८८७ रोजी तंजावर जिल्ह्यातील तिरोड गावी झाला. त्यांचे वडील श्रीनिवास अय्यंगार कुंभकोणमच्या एका कापडाच्या व्यापाऱ्याकडे नोकरी करत होते. रामानुजनच्या आईचे नाव कोमलता अम्मल अस होतं. त्याच्या यपाचव्या वर्षी रामानुजनचे नाव कुभकोणमच्या प्राथमिक शाळेत दाखल करण्यात आले. गणितावर ५ त्यांचे कल्पनातील प्रभुत्व होते. कधी-कधी ते शिक्षकांना असे प्रश्न विचारत की, त्यांचे शिक्षकही कोड्यात पडत.

केवळ दोनच वर्षात त्यांनी प्राथमिक शालेय अभ्यासक्रम पूर्ण केला आणि वयाच्या दहाव्या वर्षी ते फायनलच्या परीक्षेत जिल्ह्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

पाढे आणि अनेक संख्यांचे वर्ग-घन-चतुर्थघात-वर्गमुळे त्यांचे तोंडपाठ होते. शाळेत असतानाच त्यांनी कार नावाच्या जगप्रसिध्द गणितज्ञांचे 'सिनॉप्सिस ऑफ एलिमेंटरी रिझल्टस इन प्युअर अॅण्ड अॅलाइ मॅथेमॅटिक्स' हे पुस्तक मिळवले त्यात सव्वाहजार सिद्धांत आहेत. ते सर्व रामानुजनणे स्व-अध्ययनाने आत्मसात केले.

रामानुजनला असणारी गणिताबद्दलची ओढ पाहून रामानुजनचे वडील चिंतित झाले होते. रामानुजनला त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी २२ व्या वर्षी त्यांचे लग्न लावुन देण्यात आले. त्यावेळी त्यांची पत्नी जानकी वय अवघे नऊ वर्षाचे होते. रामानुजन यांची जबाबदारी वाढल्याने नोकरी शोधण्यास सुरुवात केली. तामिळनाडुच्या विविध कार्यालयात ते जात त्यांना कोणी थारा देत नसत तरी गणितच त्यांच्या उपयोगी पडले. मद्रास पोर्ट ट्रस्टचे संचालक फ्रान्सिस स्प्रिंग हे त्यांच्या तळपत्या गणिती बुध्दीनं मुग्ध झाले. दरमहा २५ रू. वेतनावर कारकुन म्हणुन नेमले.

रामानुजननी इंग्लडमधील केंम्ब्रिज विद्यापीठातील सुप्रसिध्द गणिती प्राध्यापक जी.एच. हार्डी यांना नऊ पानी पत्रात आपले गणिती शोध कळवले. ते वाचुन प्रा. हार्डी अचंलित झाले. त्यांनी रामानुजनला १९१४ मध्ये इंग्लडला बोलावले तेथे त्यांच्या प्रतिथेला आणखीन पंख फुटले व त्यांनी मुलभुत असे काम करून अनेक सिद्धांत मांडले. केंम्ब्रिज महाविद्यालयात ३ हजार प्रमेय अगणारे महान भारतीय गणितज्ञ होते.

''जादूचा चौरस'' हा रामानुजन यांचा आवडता उद्योग यात पहिल्या ओळीत रामानुजन यांच्या जन्मदिनांक, महिना व वर्ष यांचा उल्लेख आहे. प्रत्येक रांगेतील अंकाची उभी, आडवी वा कर्णाच्या दिशेने येणारी बेरीज १३९ होती.

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | १२ | १८ | ८७ |
| ८८ | १७ | ९ | २५ |
| १० | २४ | ८९ | १६ |
| १९ | ८६ | २३ | ११ |

इंग्लडच्या कडाक्याच्या थंडीला रामानुजन यांचा शकाहार रोखू शकत नव्हता ते क्षयाने ग्रासले. त्याकाळी त्यावर उपाय नव्हता ते थकत खंगत गेले. रामानुजन आजारी असताना प्रा.हार्डी हे इंग्लंडच्या 'पुतनी रूग्णालयात' भेटण्यास टॅक्सीने गेले. टॅक्सीचा नंबर होता १७२९ हार्डींना ती संख्या डल, अशुभ वाटली. पण रामानुजन पटकन म्हणाले हा फार रंजक व महत्वपुर्ण आकडा आहे. दोन घनांच्या बेरजेच्या स्वरूपात दोन प्रकारे मांडता येणारी ही सर्वात लहान संख्या आहे.

$१२^3+१^3=१७२९=१०^3+९^3$ तेव्हापासुन सारे जग १७२९ ला रामानुजन अंक म्हणून ओळखु लागले. ते म्हणायचे ''कोणत्याही संख्येला चिकित्सेने पाहिले की, संख्येत चेतना निर्माण होते आणि ती बोलकी होते.''

मात्र मृत्युने त्यांचा का चोखपणे पार पाडल आणि २६ एप्रिल १९२० रोजी वयाच्या तेहतिसव्या वर्षी या भारतीयांना अभिमान वाटावा अशा थोर गणितज्ञाचे निधन झाले.



# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले

**'ज्ञान नाही विद्या नाही, ते घेणेची गोडी नाही,**
**बुद्धी असून चालत नाही, तयास मानव म्हणावे का?'**

असा महत्वपूर्ण प्रश्न काव्यातून निर्माण करून अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडलेल्या दिनांना दैदिप्यमान मार्ग दाखविणाऱ्या खरीखुरी विद्येचे दैवत असणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म दिनांक 3 जानेवारी 1831 मध्ये सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे नेवासे पाटलांच्या कुळात झाला व अवघ्या नवव्या वर्षीच त्यांचा विवाह युगप्रवर्तक क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्याशी झाला. इसवी सन 1840 पासून त्यांच्या शिक्षणाला प्रारंभ झाला व ज्योतिबाच्या ज्योतीवर ज्ञानाची ज्योत पेटली. अंधाराला संपविण्यासाठी महात्मा फुले यांनी इथल्या वर्ग व्यवस्थेला उध्वस्त करण्यासाठीच जे समतेचे महायुद्ध पुकारले होते, त्यात सावित्रीने उडी घेतली. आपल्या संसाराचा त्याग करून इतरांच्या कल्याणासाठी झिजली.

या देशाचे सर्व अनर्थ एका अविद्येने केले हे कटू सत्य महात्मा फुले यांनी ओळखून, इसवीसन 1848 मध्ये पुणे येथे भिडे यांच्या वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली व सावित्री 1 जानेवारी 1848 रोजी तिथल्या पहिल्या शिक्षिका झाल्या. देशातून पहिली स्त्री शिक्षिका बनण्याचा मान पटकावला.मनूवादाने बरबटलेल्या नराधमांनी सावित्रीबाईंच्या अंगावर शेण, दगड- गोटे टाकून त्यांना विचलित करण्याचा प्रयत्न केला पण सावित्रीबाईंनी माझ्या कार्याबद्दल फुलांचा वर्षाव होत आहे असे सांगून समतेचा ज्वालामुखी आपल्या हृदयामध्ये सतत धगधगत ठेवून कार्याला गतिमान केले. इसवीसन 1852 मध्ये जेव्हा शाळांची तपासणी झाली तेव्हा सावित्रीबाईंना आदर्श शिक्षिका म्हणून अभिप्राय मिळाला. म्हणूनच 12 जानेवारी 1853 रोजी मेजर कॅन्डी यांच्या हस्ते फुले दाम्पत्यांचा विश्रामबाग वाड्यात त्यांच्या कृतीयुक्त कार्याबद्दल गौरव करण्यात आला. या प्रेरणेने नंतर सावित्रीबाई व ज्योतिबा

पेटूनच उठले. हिंदुधर्माच्या सुधारणेसाठी आपले उभे आयुष्य खर्ची घातले सुधारण्याचा भाग पुढे नेत असताना त्यांनी बाल विवाह, सती प्रथा, जातीभेद , कर्मकांड यांचा धिक्कार करून विधवा पुनर्विवाह व एकेश्वरवाद यांचा पुरस्कार केला. तसेच समतेची शिकवण सुद्धा दिली.

तत्कालीन कुमारिकांच्या मुलांची बालहत्या प्रचंड प्रमाणावर होत होती. तेव्हा निष्पाप अर्भकांची हत्या होऊ नये म्हणून महात्मा फुले यांनी इसवी सन 1853 मध्ये आपल्या घरात बालहत्या प्रतिबंधक गृहाची सुरुवात केली. तेव्हा सावित्रीने त्याचा आनंदाने स्वीकार केला. या पवित्र कार्याने कित्येक मुलांना जीवनदान मिळाले पण या सावित्रीबाई ज्योतिबा यांना स्वतःला मूलबाळ झाले नाही. सावित्री ज्योतिबांना म्हणाल्या "मला मूल होत नाही, तेव्हा तुमचे दुसरे लग्न करावे" तेव्हा समतेचा महामेरू असणारे फुले म्हणाले, "कदाचित माझ्यात  दोष असेल,  आपण तुझेच दुसरे लग्न करू व आपण त्याचा स्वीकार करू". सावित्री स्तब्ध झाल्या. केवढे हे औदार्य! मग पुढे या दाम्पत्याने काशीबाई नावाच्या एका ब्राह्मण विधवेचा मुलगा यशवंत याला दत्तक घेतले व तो पुढे शिकून डॉक्टर झाला.

एकदा ज्योतिबा घरी नव्हते व त्यांना विरोध करणारे त्यांच्या भाऊबंदकीचे माणसे घरी आली. तेव्हा सावित्रीबाईने त्यांना गोडधोड जेवण करून घातले. हे ज्योतिबा ला कळवावे ज्योतीबांनी सावित्रीला असे का केले? असे विचारले त्यावर त्या उत्तरल्या 'त्यांच्या बापाचीच कमाई खात आहेत' हे ऐकून ज्योतिबा प्रसन्न मुद्रेने हसतच राहिले आज भारताच्या अखंड ते साठी राष्ट्रीय एकात्मतेसाठी हा मोलाचा संदेश आजही दिपस्तंभ ठरतो. सावित्रीबाई समतेच्या उर्जास्त्रोत होत्या सतत मेणबत्ती समान जळणाऱ्या सावित्रीला कधीही सोने नान्यांच्या दागिन्यांच्या मोहाने स्पर्श केला नाही. काळ्या मन्याची पोत व एक मंगळसूत्र तिचे सौभाग्याचे कुंकू हे दागिने होते. सावित्री ज्योतिबा घरी नसतानाही अनेक गरजू लोकांच्या गरजा भागवून त्यांना न्याय दिला.

**रूपाली शिंदे**
एस.वाय.बी.ए. (इतिहास)




# लोकसंख्येचा भस्मासूर

लेकुरे उदंड जाहली । तोते लक्ष्मी निघून गेली ।
बापुडे भिकेस लागली। अन्न खावया मिळेना ।।

समर्थ रामदास यांच्या मतानुसार लोकसंख्या वाढ हा कोणत्याही एका रस्त्याचा प्रश्न नाही हा प्रश्न जगाचा आहे. जगातील प्रत्येक देश लोकसंख्या वाढीच्या प्रश्नाने हैराण झालेला आहे . वेळ अशी आहे की कोणतीही समस्या निर्माण झाली तरी त्या समस्याचा सरळ संबंध लोकसंख्यावाढीशी असतो. जगातला प्रत्येक प्रश्न लोकसंख्यावाढीच्या प्रश्नांशी निगडित आहे. जगातल्या अनेक समस्येचे मूळ लोकसंख्या वाढ हे आहे. अन्नधान्य टंचाई, गलिच्छपणा , मागासलेपणा , अपुरा पाणीपुरवठा, जंगलतोड, दारिद्र्य एक ना दोन हजार प्रश्न लोकसंख्येच्या या भस्मासुराने निर्माण केले आहेत. हे प्रश्न सोडविण्यात राष्ट्राची सारी शक्ती खर्च होत आहे. समस्या तर सुटत नाहीच, उलट त्या भयानक स्वरूप धारण करत आहेत.

या समस्या सोडविण्यासाठी जगातील अनेक देश शर्थीने प्रयत्न करत आहेत. कुटुंब नियोजन हा उपाय लोकसंख्या नियंत्रणात ठेवू शकतो. पाश्चात्त्य राष्ट्र यात यशस्वी सुद्धा झाले आहेत पण पूर्वीय राष्ट्रात कुटुंब नियोजन खंबीरपणे राबविता आले नाही त्यामुळेच विकसनशील व अविकसित राष्ट्रात लोकसंख्येचा विस्फोट घडून आला आहे लोकसंख्येच्या भस्मासुराला वेळीच रोखणे आवश्यक आहे. सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार व्हायला पाहिजे. शिक्षणामुळे परिवर्तन घडून येईल आणि लहान कुटुंबांचे सुख कशात आहे याची समाजाला जाणीव होईल. लोकांना अनेक सुधारणा देण्याचे कार्य प्रत्येक देशाचे सरकार करीत असते परंतु लोकसंख्यावाढ ही सर्व सुधारणा सर्व योजना फस्त करत असते. दरवर्षी अन्नधान्यात उत्पादनात लाखो टनाची वाढ होत असते. अन्नधान्याच्या वाढीसाठी सरकार कसोशीने प्रयत्नही करत असते. परंतु लोकसंख्यावाढीमुळे अन्नधान्याची प्रचंड टंचाई भासते लाखो लोक उपाशी राहतात सर्वात जास्त झळ पोहोचते. ती स्त्रियांना आणि बालकांना कुपोषणामुळे हजारो बालकांचा मृत्यू होतो. मानव कल्याण आयोगाने यावर तातडीने उपाय योजले पाहिजेत.

लोकसंख्या वाढीचा पर्यावरणावर विपरित परिणाम होत आहे. पर्यावरण नष्ट होत असल्यामुळे दूषित असल्यामुळे दूषित वातावरणाचा मानवाला सामना करावा लागतो. अनेक रोगांचे आक्रमण मानवी जीवनावर होते. नवीन पर्यावरण ए निर्माण केली तरी तीही कमी पडणारच इंधनासाठी आजच्याप्रमाणे पुढेही जंगलाचा वापर होणारच मग यावर खर्च करण्याऐवजी लोकसंख्या नियंत्रण केल्यास हीच समस्या नव्हे तर अनेक समस्या आपोआप सुटतील.

एक कल्पना सहज मनात येऊन गेले. लोकसंख्यावाढीचा पासून निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यात शक्ती खर्च करण्याऐवजी मूळ समस्या मुळासकट उपटुन फेकली. तर अनेक प्रश्न अनेक समस्या सुटके सारख्या सुटू शकतात. ती मूळ समस्या म्हणजे लोकसंख्येच्या वीस फूट आला आला घालने होय लोकसंख्या विस्पोट थांबविणे ही सहज साध्य गोष्ट नसली तरी असाध्य मात्र नाही. भारतापुरते बोलायचे झाल्यास लोकसंख्येला आळा घालणे आवश्यक आहे. कुटुंब नियोजन निरोध या व इतर उपायांची खंबीरपणे अंमलबजावणी केल्यास निश्चितच यश मिळू शकते आणि भारतातील भावी पिढी सुखा समाधानाने वैभवात राहू शकते.

वाढत्या लोकसंख्येचे फायदे असू शकतात हे तसे ऐकायला विचित्र वाटते पण असं होऊ शकते. प्रचंड वेगाने वाढणारी लोकसंख्या हे भारतासाठी एक गंभीर समस्या बनली असली तरी ती एका चांगल्या संधी मध्ये बदलली जाऊ शकते चला लोकसंख्येचे फायदे किंवा सकारात्मक परिणाम काय आहेत ते जाणून घेऊयात भारतात पन्नास टक्के पेक्षा जास्त जनता वय वर्ष 35 च्या खाली आहे म्हणून भारताला एक तरुण देश असेही संबोधले जाते आणि ही एक उत्तम गोष्ट आहे जपान आणि काही युरोपियन विकसित देशांमध्ये जवान नागरिक खूप कमी आहेत कुठलाही देश चालवण्यासाठी तरुण कामगार नोकरवर्ग प्रशासन अधिकारी खूप गरजेचे असतात भारताकडे ते भरभरून आहेत त्यांना योग्य प्रशिक्षण दिले तर अशा देशांमध्ये खूप चांगल्या नोकऱ्या मिळू शकतात.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी ही गोष्ट चांगली आहे त्यांनी 'स्किल इंडिया', 'स्टार्टअप इंडिया', 'मेक इन इंडीया' यासारख्या योजना राबवल्या आहेत यातून भारतीय जनतेला जास्तीत जास्त नोकऱ्या उपलब्ध करून देण्याचा भारत सरकारचा प्रयत्न आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे भारतासमोर खूप अडचणी आहेत आणि नवीन येत नाही राहतील. पण याला अडचण न म्हणता लोकसंख्या कडे एक संधी म्हणून पहावे लागेल. या प्रचंड जनतेला शिक्षण, प्रशिक्षण आणि सगळ्यात महत्वाचे प्रोत्साहन देण्याची गरज आहे आणि मग ही प्रचंड लोकसंख्या भारताची ताकद म्हणून उभी राहील.

पुजा घाडगे
एस.वाय.बी.ए. (भूगोल)



# माझ्या मराठीची बोलू कवतिके

"माझ्या मराठीची बोलू कवतिके
परि अमृताचे पैजा जिंके

संत शिरोमणी ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया घालताना ज्ञानक्षीररूपी माय मराठीचा गौरव आपल्या ज्ञानेश्वरीमध्ये केला आहे. 'अवघे विश्वची माझे घर' ही संकल्पना फार पूर्वी पासून मांडून ठेवली आहे. परंतु प्रचंड वेगाने धावणाया व दिवसेंदिवस आधुनिक होणाया आजच्या समाजात टिकाव धरावयाचा असेल तर मराठी भाषेचा, संस्कृतीचा जागृकतेने विचार करायला हवा. इंग्रजी ही काळाची गरज आहे. परंतु त्याशिवाय पर्याय नाही हा समज लोकांच्या मनातून काढायला हवा. इतर भाषाबरोबर मराठी भाषाही तितकीच महत्वाची आहे.

आज भारतातील मोठमोठी शहरेच नव्हे तर अगदी ग्रामीण भागात देखिल मराठी शाळेत विदयार्थ्यांना पाठवले जात नाही. मराठीत बोलणे कमीपणाचे वाटते. प्रत्येक व्यक्तीचा व्यक्तीमत्व विकास हा त्यांच्या मातृभाषेतूनच होत असतो. मग आपण आपली मातृभाषा विसरून कसे चालणार हा विसर सध्याच्या तरूण पिढीमध्ये प्रकर्षाने जाणवतो. या युवकांना मराठीतील शब्द रंजक व नवखे वाटतात. पर्यायाने उपहासालाही पात्र ठरतात. अशाप्रकारे आपणच कुठेतरी मराठीच्या दुरावस्थेला कारणीभूत ठरतोय.

भारतातील समृद्ध अशा बंगाली, उडीसा, तामिळ, साहित्यांच्या पंक्तीत मराठी साहित्याचा समावेश केला जातो. कारण वैचारिक, नैमित्तिक व आनुषांगिक विचार मंथन घडवून आणण्याची प्रचंड ताकत व क्षमता मराठीमध्ये सामावलेली आहे. आशिया खंडातील प्रबळ राष्ट्र होऊ पाहणाया चीन सारख्या देशाचे उदाहरण आपल्या समोर आहे. चीनमध्ये सर्व संगणकीय व्यवहार चीन भाषेतच अनिवार्य आहे. त्यामुळे मायक्रोसॉफ्ट सारख्या कंपनीला देखिल गुडघे टेकावे लागले. व त्यांना चीन भाषेत सॉफ्टवेअर बनवावे लागले. सर्व राष्ट्रांनी जर आपले सर्व व्यवहार आपल्या भाषेतच केले तर भाषेचे महत्व कायमस्वरूपी टिकून राहिल.

मध्यंतरीच्या काळात एका मराठी वृत्तपत्राने सुरू केलेल्या "आम्ही मराठीत शिकलो" या सदरात मराठीतून शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात प्रचंड भरारी घेणाया व्यक्तींच्या मुलाखती छापून आल्या होत्या. त्यातच "परम" संगणकाचे निर्माते डॉ. विजय भटकर यांचा देखिल समावेश यामध्ये होता. प्रत्येक शाळा, महाविदयालयात मराठी विषय सक्तीचा करणे गरजेचे आहे. सध्या तंत्रज्ञानासारख्या विषयाला मराठी ऐच्छिक म्हणून न ठेवता विज्ञान तंत्रज्ञानासारखे विषयच मराठीमध्ये ठेवले गेले पाहिजे.

शिकागो येथील भाषणात स्वामी विवेकानंदांनी म्हटले होते की भारतासारखा देश टिकून आहे कारण त्यांचे ग्रंथप्रामाण्य, सामर्थ्य व शक्ती/भक्ती प्रचंड आहे. तसेच हे ग्रंथप्रामाण्य समजण्यासाठी मराठी भाषेची गरज आहे. मराठी भाषेची उपेक्षा केल्यास महाराष्ट्राची उपेक्षा झाल्यावाचून राहणार नाही. समर्थ रामदासांनी यांचे विवेचन खालीलप्रमाणे केले आहे.

"येक म्हणती महाटी काय | ती नेणे मूर्खपणाची सोय अर्थान्वयाची ||
लोहाची मांदूस केली | नाना रत्ने साठविली |
दुर्भाग्याने ती त्यागिली | लोखंड म्हणोनी ||
तैसी भाषा प्राकृत" ||

म्हणजेच माणिक सम मराठी भाषेची अवस्था ही लोखंडासारखी झाली आहे. चला तर मग पुन्हा आपल्या मराठी भाषेला विश्वक्षितीजावर पूर्णतेजाने पुन्हा झळकावूया गरज आहे ती फक्त प्रामाणिक प्रयत्नांची.

अभिमान मराठी | स्वाभिमान मराठी

प्रा. सौ. सुरेखा विठ्ठल देशमुख (मराठी विभाग प्रमुख)

# EXPERIENCED THOUGHTS

- A human is said to be successful only when they make their society successful.
- If we do not help our anger to find its path then it may become a double-edged sword.
- Life is all about one's requirement and of fulfilling ones requirement.
- What does the world needs to change? The truth or the cleverness.
- It's true that action speaks more than words but we cannot replace words by action because words comes from heart and reaches heart.
- Life is simple your choices makes it difficult.
- Revenge may lay us in danger. So think....
- Your attitude should not be bigger than your friendship.
- Fool buys restrictions.
- Generation gap doesn't stops you they just make you aware by their experiences so think...
- Perfection demands lots of mistake.
- Don't try to judge people that will take you away from them.
- Life is a game it must be played with sportsmen sprit.
- A bit tense may take you to your success.
- Every life is perfect but for others.
- What's life? Ans is the one which u r living in diff... Situations
- Every art comes from heart.
- Unsaid words can be heard by a caring heart

कष्ट हे करणाऱ्याच्या कामात नव्हे तर ते पाहणाऱ्याच्या डोळ्यात आणि ऐकणाऱ्याच्या कानात गणले जाते.

**Prof. N. D. Padale**
HOD
Department of Computer Science

### आयुष्याचं पुस्तक

आयुष्य नावाचं एक पुस्तक असतं
त्या पुस्तकात सुख आणि दुःख असतं
सुखात सगळ काही मिळत असतं
पण दुःखात जीवन असल्यासारखं असतं
आयुष्याच्या पुस्तकात सगळं काही मिळल असं नसतं
मिळालं तर आपलं असतं
नाही मिळालं तर नशिबातच नसतं
जीवन नावाचं पुस्तक असेच असतं
जीवनात येणारा प्रत्येक व्यक्ती नवा असतो
म्हणून तर तो अनुभव देत असतो
अनुभव आयुष्य बदलत असतो
म्हणून तर तो मिळवायचा असतो
आयुष्य असंच जगत चालायचं असतं कधी छोटं
तर कधी मोठ होऊन लढायचं असतं
आयुष्याच्या पुस्तकात कधीच कोणाला विसरायचं नसतं
कारण त्यात सुख किंवा दुःख मिळवून जगायचं असतं

**- आरती नागवडे**
वाणिज्य शाखा






### प्रेम म्हणजे ?

मला माझ्या मित्राने विचारले की प्रेम म्हणजे नेमके काय?
मी त्याला सांगितले की.
कितीही जवळ जाणार असशील तरी गाडी
सावकाश चालव आणि पोहचल्यावर फोन कर
असे आईचे काळजीचे बोल म्हणजे प्रेम.
दिवाळीला स्वतःसाठी साधी कपडे न घेता
मुला मुलींसाठी त्यांच्या पसंतीचे
महागातले जीन्स आणि कपडे घेणारे
बाबा म्हणजे प्रेम
कितीही मस्ती केली व रात्री लेट झाला
तरी आई-बाबांना न सांगता हळूच दार उघडणारे
आजी आजोबा म्हणजे प्रेम.
कितीही वाद झाले तरी जेवलास का
अशी विचारणारी बहिण म्हणजे प्रेम.
पगार कितीही कमी असेल
तरीही रक्षाबंधनाला भाऊबीजेला बहिणीच्या पसंतीची साडी
घेणारा भाऊ म्हणजे प्रेम........

**- सारिका जगताप.**
एस वाय बी सी एस

## माय माऊली

जगी माऊली सारखे कोण आहे,
जिचे जन्मांतरीचे ऋण आहे,
असे ऋण हे ज्यास व्याज नाही,
त्या ऋणाविन जीवनास साज नाही,
जिच्यासारखे कौतुके बोल नाहीत,
जिच्या यातनांना जगी तोड नाही,
तिचे नाव जगात आई...
आई एवढे कशालाच मोल नाही.

**-प्रा.जयराम पवार**
भूगोल विभाग प्रमुख

## आयुष्यात स्वप्न पाहताना

आयुष्यात स्वप्न पाहताना
वास्तवाला विसरायचं नसतं
गुलाबाला स्पर्श करताना
काट्याच भान मात्र ठेवायचं असतं.
प्रीतीच्या मोहाच्या विश्वात वावरताना
जपून पाऊल टाकायचं असतं
अन काळजाला फटका बसल्यावर
मात्र रडायचं नसतं.
संकटाच्या वादळाला धीर धरून जगायचं असतं
शत्रुंशी झुंजत असताना त्यास
कमजोर लेखायचं नसतं.
उध्वस्त झालेले विश्व आपलं
शुन्यातुन उभ करायच असतं
आपल्या वेदनांच मीठ मात्र चोळायाचं नसतं.
खाललेल्या मिठाला, जिवाभावाच्या मित्राला
कधीच बेईमान व्हायचं नसतं.
अन आई-वडिलांचे ऋण फेडल्याशिवाय
मरणाचं नाव सुद्धा घ्यायचं नसतं.

**- जाधव स्नेहा**
एस वाय बी सी एस



## ........मैत्रीण माझी.......

मैत्रीण माझी नाजुक फुलासारखी

मैत्रीण माझी नाजुक फुलासारखी
वाऱ्याबरोबर डोलणाऱ्या इवलाश्या रोपटयासारखी

हसण तिच खळखळणाऱ्या झऱ्यासारख
मनही तिच त्यातील निर्मळ पाण्यासारख

आहे ती अशीच अश्रुसोबत हसणारी
मनातील वादळांना मनातच थोपवणारी

भासते कधी आकाशातील चांदणीसारखी
तर कधी सागराबरोबर खेळणाऱ्या लाटेसारखी

तशी आहे ती माझ्यापासुन दुरवर
तरीही अंतःरात रुतलेली खोलवर

तुझ्या मैत्रीच्या छायेत मला क्षणभर विसावू दे
हरलो जरी मी, आपली मैत्री मात्र सदैव जिंकू दे..

**विशाल कांबळे**
एस.वाय.बी.सी.ए.

**माझे गाव...**

नदीच्या घाटावर, बांबुच्या बेटावर
तळ्याच्यसा काठावर, डोंगराच्या दरित
कडा-कपारित, शीळ वाजवत फिरली

शहरातील एका ती माझ्या गावात आली....
छपराची घरं, खेळणारी पोरं चरणारी
गुरं पाहीली, मोकळ्या माळराणवर
वासरासारखी बुंदडली, शहरातील
एक ती माझ्या गावात आली.....

हिम्मत करून तिला एकदाचे लव्ह यू म्हटले
तर होकार देवून एकदम गोरी मोरी झाली
शहरातील एक ती माझ्या गावात आली....

म्हणे गाव तुझं छानसं, एक काळी बेरी
माणसं, सोडुन गाव शहरात चल,
ऑफर मला दिली शहरातील एक
ती माझ्या गावात आली....
ती माझ्या गावात आली....

म्हटलं तुझ्या शहरापेक्षा गावच बरं,
माणसं लहान, पण बागणं खरं
एवढं ऐकुन, तुच्छेपणे गुडबाय म्हणाली
शहरातील एक ती माझ्या गावात आली,
माझ्या गावात आली................

**कुसेकर चेतन सुरेश**
**(एस.वाय.बी.ए.)**



क्षणांचे पक्षी अलगद हातुन निसटुन जातात
जाताना आठवणींची पिसे मात्र मागे ठेऊन जातात
हीच पिसे मनाच्या पुस्तकात पुन्हा जपली जातात
आणि म्हणनुच त्या पिसात लपलेले क्षण पुन्हा आठवणी आणतात.

कधी-कधी जीवनात इतकं बंधुंद व्हावं लागतं
दु:खाचे काटे टोचतानाही खळखळून हसावं लागतं
जीवन यालाच म्हणायचं असतं
दु:ख असुनही दाखवायचं नसतं
मात्र पाण्याने भरलेल्या डोळ्यांना पुसत
आणखी हसायच असतं......



**संकलन**
**सागर दळवी**
**(टी.वाय.बी.कॉम.)**

## मला नाही जमणार ....

असशील तु सुंदर, पण मन काळंच असणार,
तु म्हणतेस म्हणुन मित्रांना सोडणे, मला नाही जमणार,
असशील तु परी, पण ते तुझ्याच घरी,
तुझ्या तालावर नाचायला, मला नाही जमणार,
तुझ्या मैत्रीनी असतील खास, पण माझ्या हृदयात मित्रांचा वास,
तुझ्या सांगण्यावरून त्यांना टाळणे, मला नाही जमणार,
तुझे पप्पा असतील आमदार, तुझे काका असतील खासदार,
पण तुझ्यासाठी मित्रांचा दरबार सोडणे, मला नाही जमणार,
तु असशील प्रेमाची झुळुक, पण माझे मित्र आहेत मैत्रीचा वारा,
या वाऱ्याच्या विरोधात वाहणे, मला नाही जमणार,
तु आहेस गुलाबाचे फुल, पण तुझ्या सहवासात काटे बोचणार,
पण माझ्या मित्रांच्या मोरपंखी सहवास सोडणे, मला नाही जमणार,
तुझे मन असेल नाजुक, पण माझ्याबद्दल काळजी नसणार,
पण माझ्या मित्रांचे मन दुखवूने, मला नाही जमणार,
तुला थोडा त्रास झाला, तरी तू लगेच सोडून जाणार,
पण मित्रांना त्रास देऊन सुखी रहाणे, मला नाही जमणार,
तुझे बोलणे असेलही भूलवणारे, पण त्याला मी नाही भूलणार,
कारण माझ्या मित्रांच्या विरोधात ऐकून घेणे, मला नाही जमणार,
तु गेलीस सोडून तरीही मला काही नाही वाटणार,
पण तुझ्यासाठी मैत्रीच सोडून देऊ हे मला नाही जमणार.......................

सुनिल लोंढे
(टी.वाय.बी.ए.)



# शिक्षकदिन - अनुभव ५ सप्टेंबरचा...

काल जीवनात पहिल्याच वेळेला
मी शिक्षक झालो होतो,
इंग्रजीचा शिक्षक म्हणून
तुमच्यासमोर आलो होतो.

मनात माझ्या नवीनच
उत्साह संचारला होता,
पण त्याच उत्साहावर
भितीचा थर साचला होता.

वाटलं होतं शिक्षक बनुन
आज खुप काही शिकवणारं,
मुलांना हक्काने उभे करून
प्रश्न आज खुप विचारणार.

त्याच विचारांची हवा
मनात फिरत होती,
भानावर तेव्हा आलो जेव्हा
पहिल्या तासाची बेल वाजली होती

थोड्या एत्साहाने आणि थोड्या भितीने
मी वर्गामध्ये प्रवेश केला,
पण शांत आहेत मुले.. हे पाहुन
मला थोडासा धीर आला.

ओळख नव्हती कोणाशीच
म्हणुन ओळख विचारू लागलो,
माझ्या तोडक्या-फोडक्या शिकवणीची
एक-एक पायरी चढू लागलो

इंग्लिशचा धडा तसा मी
तोंडपाठच केला होता,
पण समोर मुले पाहुन
तो कधीच भुईसपाट झाला होता

खिडकीतून छान हवा येत होती
तरी दरदरून घाम फुटला होता,
पाणी भरपुर पिलो होतो मी
तरी घसा मात्र कोरडा पडला होता



त्याक्षणी गुरू मला तुमची आठवण आली
एकाच क्षणात खुप काही सांगुन गेली,
अगदी क्षणभरची ती आठवण होती, पण
मागच्या दोन वर्षाचा आरसा दाखवून गेली

तेव्हा कळल मला की
तुम्ही कसे सहन करत असाल,
आम्हाला रोज शिकवण्यासाठी
किती तयारी करत असाल

कसा बसा माझ्या तोडक्या शिकवण्याचा
तो पहिला अर्धातास संपुन गेला,
पण जाता जाता तो अर्धा तास
मला खुप काही शिकवून गेला

कारण शिक्षक झालो तेव्हाच कळलं की
किती सहन करावं लागतं शिकवत असताना

आता कुठेही गेलो तरी
तुमची आठवण येत राहील,
आजचा दिवस मात्र
नेहमीच आठवणीत राहील

एका दिवसापुरतं शिक्षक होण
खरंच खुप सोपं असतं
पण शिक्षक होऊन पिढी घडवणं,
खरंच खुप अवघड असतं.

शुभेच्छा देऊन 'शिक्षकदिनाच्या'
मी आता इथेच थांबतो,
एका दिवसाचा शिक्षक होता आले
यातच मी धन्यता मानतो.....

जय हिंद जय महाराष्ट्र

**सुनिल लोंढे**
**(टी.वाय.बी.ए.)**

## Girlfriend....

प्रत्येकास वाटते आपली ही हवी एक Girlfriend
आजच्या काळातला हाच आहे Trend
मग होताच कोणाशीह नजरानजर
होतात हजारो Massage Send
विचारतात रोजची कामे सुध्दा
आठवत नाही मग Best Friend
नेहमी राहतो मनात विचार तिचा
सध्या कशी असेल माझी Girlfriend
बाबु, सोना, पिल्लु अशा
नावाचा सुरू होतो Game
नेहमी अपेक्षा होते मनाला
असेच तिनेही म्हणावे Same
वाटते खुप साहसी मनाला
आपण स्वत:लाच भासतो Legend
वाटते आपण नाही भीत कोणालाच
तेव्हा हटतो डोळ्यांवरचा प्रेमधूर
तेव्हा सावरून घेतात फक्त Friend
मग वाटते नको ती Girlfriend
खुप चुकीचा आहे हा Trend
मग मात्र आपणांस
आठवतो फक्त आपला Friend

**– अजित लोंढे**
व्दितीय वर्ष कला

## तु तर शिवबाचा वाघ आहे....

होऊ नकोस ना उमेद
हा तर जगण्याचा एक भाग आहे
अरे रडतोस काय वेड्या
तु तर शिवबाचा वाघ आहे
आली किती ही संकटे
तरी लढणे तुला भाग आहे
अरे रडतोस काय वेड्या
तु तर शिवबाचा वाघ आहे
सरेल दु:खाचा अंधार
समोर सुखाची पहाट आहे
अरे रडतोस काय वेड्या
तु तर शिवबाचा वाघ आहे
तुश्रयात होणारा बदल म्हणजे
तुश्रया विचारांना येणारी जाग आहे
अरे रडतोस काय वेड्या
तु तर शिवबाचा वाघ आहे

सौंदर्य–सौंदर्य म्हणून किती जपशील स्वत:ला
निरखून पाहीले तर चंद्राला ही डाग आहे
अरे रडतोस काय वेड्या
तु तर शिवबाचा वाघ आहे
दे झोकुन स्वत:ला कष्टाच्या आगीत
तोच तुझा खरा साज आहे
अरे रडतोस काय वेड्या
तु तर शिवबाचा वाघ आहे
युद्धाच्या आरंभी सुरू होणाऱ्या
ललकारीचा तु नाद आहे
अरे रडतोस काय वेड्या
तु तर शिवबाचा वाघ आहे
करून टाक बेचीराख दुश्मनांना
हृदयात तुझ्या धगधगती आग आहे
अरे रडतोस काय वेड्या
तु तर शिवबाचा वाघ आहे



**– अजित लोंढे**
व्दितीय वर्ष कला

## आज नाही रडणार.....

आली कितीही संकटे तरी
आज मागे नाही सरणार
झाले कितीही दु:ख तरी
आज नाही रडणार....

उठून नव्या उमेदीने
आज पुन्हा लढणार
सर्व शक्ती एकवटून
आज पुन्हा भिडणार....

पाठ मी माझ्या स्वप्नांची
ऐवढ्या सहजपणे नाही सोडणार
अंतर मी माझ्या धेयाचे
जास्त वेगाने मी तोडणार

आले कितीही नैराश्य तरी
आज मागे नाही पडणार
पडलो कितीही वेळा खाली
तरी मी पुन्हा-पुन्हा उठणार



सत्य असले कडू जरी
तरी मी ते पचवणार
दु:खाचे प्याले सारे
आज मी रिचवणार

ध्येयाकडे जाणारी वाट
आज मी शोधणार
पहायचंय मला हे आज



## नको कोसळू आभाळा....

नको कोसळू आभाळा माझी झोपडी गळते
पोटी लेकरू घेऊन माय मनात जळते
झाला पाय असा वैरी छत लागलं उडाया
थंडी भिडली हाडांना पोर लागली रडाया
नाही टेकायला जागा, सारी भुई झाली ओली
डोळं रडुन सुजले,  तान्हुल्याला झोप आली
सर थांबता थांबेना, कशी देत राही हुल
आज पाण्यानं गुजारा, नाही पेटली ही चुल
कुडातून हवा येई दिवा विझतो सारखा
असं गरीबाचं जिवा, जिव आमुचा पोरका
किती सोसला पाऊस, किती लोटला हा काळ
नशिबात नाही साधी, एक सुखाची सकाळ
वाटे जिवन द्यावा आता, पण थांबती पाऊल
पारांकडे पाहुनिया, लोग सुखाची चाहुल

**प्रिया राजेंद्र कुतवळ**
तृतीय वर्ष वाणिज्य

## संगणक / कंम्प्युटर

बडे काम का कंम्प्युटर है
ना जमाने का ट्युटर है
चाहे हो जितना कठिन सवाल
हल कर देता है तत्काल ।

तेजी से काम करता है इसकी शान
पहुँचा ऑफिस बैंक और दुकान
कॉपी फाईल जितनी लाओ
मेमोरी में भरते जाओ ।



सब कुछ इसको याद रहेगा
जो कुछ पूछो बता देगा
प्रिंटर की तकनीक है पाई
आकर्षक वह करे छपाई ।

शतरंज खेले करे कमाल
वर्ल्ड चैम्पियन हो बेहाल
इंटरनेट से जोडकर नाता
दुनिया भर की सैर कराता ।

तभी तो यह है सब का प्यारा.

## कंम्प्युटर हैं मेरा साथी

कंम्प्युटर है मेरा साथी
हरदम साथ निभाता है
हर ताले का कुंजी है
अजब-गजब दिखलाता है



बटन अनूठे बोर्ड बने
मनचाहा मै लिख पाऊ
कठिन सवालो के उत्तर
पल के हल कर दिखलाऊ

ज्ञान-विज्ञान की बातों को
स्टोर करना मेरा काम
कठिन सरल कोई सवाल हो
क्षण मे कर दूं काम तमाम

कंम्प्युटर पर माऊस चला
जो मांगू मिल जाता है
इस युग का है चमत्कार
प्रगति मित्रा कहाता है

**रेश्मा बोत्रे**
तृतीय वर्ष संगणक शास्त्र

## आयुष्य



आयुष्य सोबत असून, जवळ कधी बघत नाही
एकाच घरात राहून आम्ही, एक–मेकास दिसत नाही
हरवला तो आपसातला, जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकास दोष ठेवून, नित्य चाले वादविवाद
धाव धाव धावतो आहे, दिशा माग कळत नाही
ह्दयाचे पाऊल कधी, ह्दयाकडे वळत नाही
इतकं जगून झालं पण, जगायला वेळ नाही
जगतो आहेत कशासाठी, काहीच कसला मेळ नाही
क्षण एक येईल असा, घेवून जाईल हा श्वास
अर्ध्यावचल थांबलेला, असेल जीवन प्रवास
अजूनही वेळ आहे, थोडं तरी जगून घ्या
सुंदर अशा जगण्याला, डोळे भरून बघून घ्या....

–सागर कळसकर
तृतीय वर्ष कला



## माझी ओळख

आईने बनवलयं ..........................
बाबांनी घडवलयं ..........................
आईने शब्दाची ओळख करून दिली ..........................
बाबांनी शब्दाचा अर्थ समजवला ..........................
आईने विचार दिले ..........................
बाबांनी स्वातंत्र्य दिलं ..........................
आईन भक्ती शिकवली ..........................
बाबांनी वृत्ती शिकविली ..........................
आईने लढण्याची शक्ती दिली ..........................
बाबांनी जिंकण्याची नीती दिली ..........................
त्यांच्या परिश्रमामुळे आज यश माझ्या ..........................
हाती आले ..........................

**सागर कळसकर**
**टी.वाय.बी.ए.**

## माणुसकिचा रंगमंच

माझ्या माणसांनो तुम्ही काळे असाल, गोरे असाल
कोणत्याही जातीचे, भाषेचे, राज्याचे असाल
पण एक गोष्ट नक्की लक्षात ठेवा
जी स्वप्नं तुमच्या आईने तूमच्या लहानपणी पाहिलीत ना
ती स्वप्नं मला वाटतं सगळ्यांची सारखीच असावीत
ज्या वेळी तूम्ही तुमची स्वप्ने साकारता ना
त्या वेळी प्रत्येकाच्या बापाच्या डोळ्यांत बघा
मला वाटतं ते प्रत्येकाचे आनंदअश्रु सारखेच असावेत
तुमच्या यशप्राप्तीनंतर तुमच्या पाठीवरून हात फिरवतांना
तुमच्या आईच्या मातृत्वाचा कंठ दाटून येतो ना, आणि
तुमच्या बापाची छाती जेव्हा अभिमानाने फुगून येते ना...
ती भावना मला वाटतं प्रत्येक आईवडीलांची सारखीच असावी
खरंतर जन्माला आलो तेव्हा कोणालाच माहित नसतं
आपण कोणत्या जातीचे, धर्माचे, भाषेचे, देशाचे आहोत
त्यापेक्षा देवाने निर्माण केलेल्या सुंदर सृष्टीचा आनंद घ्या
हे जग म्हणजे एक माणुसकीचा रंगमंच आहे.... आणि
या रंगमंचावर असा अभिनय करा की,
आपला अभिनय संपला तरी
टाळ्या वाजतचं राहिल्या पाहिजेत..........................

**सागर कळसकर**
**टी.वाय.बी.ए.**





## एक तरी मुलगी असावी ...............

एक तरी मुलगी असावी, उमलतांना बघावी
नाजुक नखरे करतांना, न्याहाळायला मिळावी ....
एक तरी मुलगी असावी, जवळ येऊन बसावी
मनातली गुपित तिने हळुच कानात सांगावी .....
एक तरी मुलगी असावी, मॅचिंग करतांना बघावी
नटता नटता आईला तिने, नात्यातली गंमत शिकवावी ....
एक तरी मुलगी असावी, गालातल्या गालात हसावी
कधीतर भावनेच्या भरात, गळ्यात मिठी मारावी
एक तरी मुलगी असावी.........
एक तरी मुलगी असावी, साजिरी गोजिरी दिसावी
नाना मागण्या पुरवताना, तारांबळ माझी उडावी.............
एक तरी मुलगी असावी.........
एक तरी मुलगी असावी.........

**दिवेकर भाग्यश्री राजेश**
**(द्वितीय वर्ष वाणिज्य)**

### "मराठी बाणा"

अंधारावर राज्य करणाचा
चंद्रालाही अभिमान वाटत असावा
कारण त्याच्याच सहवासात राहून
मराठा स्वराज्याची राखण करत असावा
एकवेळ मुंडके उडवले तरी चालेल
पण मान कोणापुढे वाकणार नाही
आणि डोळे काढले तरी चालेल
पण नजर कोणापुढे झुकणार नाही
जिभ कापली तरी चालेल पण
प्राणाची भिक कोणापुढे मागणार नाही
हात कापले तरी चालतील पण
ते कोणापुढे जोडणार नाही
मरण आले तरी चालेल
पण शरण जाणार नाही
प्राण गेला तरी चालेल
पण हिंदु धर्म सोडणार नाही
जंगलातील सगळ्यात कठीण
लाकडाला साग म्हणतात
सापातील विषारी जातीला
नाग म्हणतात आणि

**दिवेकर भाग्यश्री राजेश**
**(द्वितीय वर्ष वाणिज्य)**






### जीवन

जीवन सुंदर आहे, निरभ्र आकाशासारखं ।
मंद पाहणाऱ्या वाऱ्यासारखं, खळखळणाऱ्या समुद्रासारखं ।।
जीवन म्हणजे सुख-दुःखाचा डोंगर अपेक्षांचा भवसागर ।
जीवन जगता जगताच भरते, आयुष्याची घागर ।।
जीवन कसे जगायचे, ज्याने त्याने त्याने ठरवायचे ।
आपणच आपल्या जीवनाचे, काटे आहेत फिरवायचे ।।
जीवन जगण्याचा धडा, कुठल्या, पाठ्यपुस्तकार नसतो ।
तो तर क्षणाक्षणांचा, अनुभवायचा असतो ।।
जीवन म्हणजे खरंच, परमेश्वराची देणगी ।
मनुष्य माम त्याला देतो, आत्महत्येची ठिणगी ।।
सुख असे जगा एवढे, तर दुःख माम पर्वताएवढे ।
म्हणुनच तर आहे तोपर्यंत आनंदाने जगून घ्यायच तेवढे ।।
जीवनाचा अंत असे, सर्वांसाठी एकच ।
सद्वर्तनाने माम, जीवन जगता येईल नेकच ।।

**सोमासे मयुरी दत्तात्रय**
तृतीय वर्ष वाणिज्य

## वेडी ही बहिणीची माया

माणसांच्या गर्दीत, हरवून बसला माझा भाऊ
सांगा ना त्याला, भेटायला कोठे येवू ....
एकुलता एक दादा, त्याला जिवापाड जपला
लग्न झाल्यापासुन, वहिनीच्या पदराआड लपला
एक दिवस तरी नको, वहिनीला भिऊ
सांग ना रे भेटायला कोठे येवू ....
नको दादा साडी मला, नको पैसा–पाणी
तुझ्या सुखासाठीच, देवाजला करते विनवणी
सांग ना रे भेटायला कोठे येवू ....
काम गेलं तुझ्या दाजीचं, म्हणुन दुसऱ्याच्या शेतात कामाला जाते
दादा चढउतार होतात जीवनात, तु घाबरून नको जाऊ
सांग ना रे भेटायला कोठे येवू ....
आई–बाबा सोडून गेले, घर पोरकं झालं



**सोमासे मयुरी दत्तात्रय**
तृतीय वर्ष वाणिज्य

## आयुष्य थोड जगुन बघायच असत



आयुष्य हे मन मोकळे पणाने जगायच असत
हसता आल नाही तरी हसवायच असत
आयुष्य थोड जगून बघायच असत

आयुष्यात जे घडेल ते सहन करायच असत
बदलत्या जगा बरोबर आपणही बदलायच असत
आयुष्य थोड जगून बघायच असत

जन्माला आल्यावर आयुष्य जगून बघायच असत
आयुष्यातील दुःख थोडं सोसून बघायच असत
आयुष्य थोड जगून बघायच असत

आयुष्यात जगण कठीण असत
पण मरण खूप सोप असत
आयुष्य थोड जगून बघायच असत

**रिंकु परदेशी**
तृतीय वर्ष वाणिज्य

## Department of B.B.A.(C.A.)

B.B.A. (C.A.) Bachelor of Business Administration (Computer Application)

Shri Vasantrao Pharate Patil Arts, Commerce & Science College BBA (C.A.) 3 Year degree course under Savitribai Phule Pune University, Pune Since June 2010 with in take capacity 80

Under this degree course various programming languages are tought to develop programming skill. Department runs various programming contents and practicals to increase programming knowledge within students department agrranges number of guest lectures on various subject by experts to increase the knowledge to the students.

In the course of time we get support from our institnted chariman Hon. Shri. Rajiv Pharte Patil. Hon. Mrs. Mrunal Pharate Patil & Principal Dr. T. S. Sawant.

Asst. Prof. Kokare S.S.
Asst. Prof. Taware B.S.
Asst. Prof. Ollala P.B.
Asst. Prof. Kalaskar M.N.

## Department of Geography

**श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित**
**श्री वसंतराव फराटे पाटील महाविद्यालय, मांडवगण फराटा**

प्रा. जयराम पवार (विभागप्रमुख)

श्री. वसंतराव फराटे पाटील महाविद्यालय भूगोल हा विषय सामान्य स्तरावर शिकवला जातो. महाविद्यालयामध्ये भूगोल विषयाचे अध्ययन शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ पासून केले जाते. या विषयाचे अध्यापनाचे कार्य प्रा. जयराम पवार करतात.

भूगोल विषयाच्या अध्यापनाबरोबर क्षेत्रभेटी, विषयगट चर्चा, शैक्षणिक सहल यांचे आयोजन केले जाते. त्याचप्रमाणे वर्ष २०१८-२०१९ मध्ये १४ जानेवारी हा दिवस भूगोल दिन म्हणून साजरा करण्यात आला. या दिवशी महाविद्यालयामध्ये प्रा. मेजर मानसिंगराव गोडसे सर यांचे आपत्ती व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान आयोजित केले तसेच महाविद्यालयात Poster Presentation, Model Presentation, Quiz Competition या सारखे उपक्रम घेतले.

त्याचप्रमाणे भूगोल विभागांतर्गत विविध विशेष दिनाचे आयोजन केले जाते. भूगोल दिन, लोकसंख्या दिन, पर्यावरण दिन, विज्ञान दिन, जागतिक वसुधंरा दिन इ. या व्यतिरिक्त वृक्षारोपन, स्वच्छता मोहिम व विविध व्याख्यानाचे आयोजन केले जाते. यामधून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडते.

# Department of Politics

श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित

श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा

प्रा. जयराम पवार (विभागप्रमुख)

श्री. वसंतराव फराटे पाटील महाविद्यालय राज्यशास्त्र हा विषय सामान्य स्तरावर शिकवला जातो. महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र विषयाचे अध्ययन शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ पासून केले जाते. या विषयाचे अध्यापनाचे कार्य प्रा. जयराम पवार करतात.

आजच्या युगामध्ये विषयाचे आकलन होण्यासाठी त्या विषयामध्ये समाविष्ट असलेल्या सर्व घटकांची माहिती घेणे गरजेचे आहे. महाविद्यालयात भारतीय शासन आणि राजकारण, राजकीय सिध्दांत आणि संकल्पना व महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था या विषयाचे अध्ययन केले जाते.

तसेच राज्यशास्त्र या विषयाच्या अभ्यासातून आपलेल्या राज्य, सत्ता, अधिसत्ता, न्याय, हक्क, स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही या सर्व घटकांची माहिती मिळते.

त्याचप्रमाणे महाविद्यालयात राज्यशास्त्र विषय संदर्भात कायदे तज्ञांना बोलावून त्यांचे व्याख्यानाचे आयोजन केले जाते. त्यामधून विद्यार्थ्यांना MPSC, UPSC, Competitive examination या साठी उपयुक्त ठरते. आजच्या आधुनिक काळात विद्यार्थ्यांमध्ये राज्यशास्त्र या विषयाची लोकप्रियता वाढताना दिसते.

# अर्थशास्त्र विभाग

श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित

श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा

श्री. वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्र हा विषय सामान्य स्तरावर शिकवला जातो. या महाविद्यालयामध्ये अर्थशास्त्र विषयाचे अध्यापन सन २०१२-१३ पासून केले जाते. सदर विषय तिन्ही वर्गासाठी शिकवण्याचे कार्य अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापिका सुप्रिया जाधव करतात.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी अर्थशास्त्र विभागाचा प्रथम वर्षामध्ये १०१ विद्यार्थी तर व्दितीय व तृतीय वर्षासाठी अनुक्रमे २८ आणि ०६ अशी विद्यार्थी संख्या आहे. या शैक्षणिक वर्षामध्ये या विभागातंर्गत विविध स्पर्धा परीक्षांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली. त्याचा विद्यार्थ्यांना फायदा झाला. त्याचप्रमाणे वेळोवेळी गेस्ट लेक्चर, व्यक्तिमत्व विकास व कौशल्य विकास कार्यक्रम आयोजित केले जातात. विभागाच्या अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयामध्ये मुबलक पुस्तके उपलब्ध आहेत.

प्रा. सुप्रिया जाधव
(अर्थशास्त्र विभाग)

# रा.से.यो. विभाग

श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित

श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा

"Not me but you" या उक्तीस अनुसरून समाजसेवेचे व्रत युवकांच्यात रुजवण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभाग आपले महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ पासून राबविला जातो. शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये महाविद्यालयाने दि. ०८/०८/२०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन महाविद्यालयाचे सन्मानिय प्राचार्य डॉ. टी.एस.सावंत यांच्या हस्ते केले रासेयो विभागाच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर स्वच्छ केला. वृक्षारोपन केले त्याच बरोबर सुशोभिकरण केले. याप्रसंगी रासेयोचे महत्व या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. दि. १९/०९/२०१९ रोजी रासेयो विभागाच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. सदर शिबिरामध्ये १११ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले त्याच बरोबर ''बेटी बचाव बेटी'' पथनाट्य व मान्यवरांचे व्याख्याने आयोजित केली. सदर कामी स्वयंसेवकांनी कठोर परिश्रम घेतले.

रासेयो च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे, नेतृत्व गुण विकास करणे, परस्पर सहकार्याची भावना वाढीस लावणे याचबरोबर राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याचे तंत्र विकसित केले जाते. यामध्ये महाविद्यालयाने संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. राजीव फराटे पाटील, सचिव सौ. मृणाल फराटे व प्राचार्य डॉ. टी.एस. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रा. अमोल पितळे (रा.से.यो.का.अ.) सौ.प्रा. सुरेखा देशमुख (रा.से.यो.का.अ.) प्रा. जयराम पवार, प्रा. संदिप कोकरे, प्रा. पुष्पांजली काटे, प्रा. मेघा बर्गे, प्रा. सुप्रिया आटोळे, प्रा. बाळासाहेब तावरे या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. त्याबद्दल रासेयो विभागाच्या वतीने आम्ही धन्यवाद देतो.

प्रा. अमोल पितळे (रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी)
प्रा. सुरेखा देशमुख (रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी)

# Department of B.B.A.

श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित

श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा

Shri Vasantrao Pharate Patil Art, Commerce and Science College run BBA (Bachelor of Business Administration) a 3 Year Degree Course under Savitribai Phule Pune University, Pune since June 2010 an intake of this faculty is 80 student's each year with specialization in marketing management, financial management & Human Resource management.

BBA department organizes industrial visit every year since 2010 we have visited prestigious industries such as united beverages four season wine pvt. ltd. kutwal foods pvt. ltd., Shri. Wagheshar dairy foods & agro product pvt. ltd. & L.V. dairies pvt. Ltd. We organize Guest lectures, seminar's for the all round development of student's personlity, currently our students are working in many reputed organization in the field fo marketing, finance & Human resource management.

In the course of time we get support form our instituted chairman Hon. Shri. Rajiv Pharate Patil, Secretary Hon. Mrs. Mrunal Pharate Patil & Principal Dr. T.S. Savant, HOD Amol Pitale. Communicated their Co-operation.

**Asst. Prof. Amol Pitale (H.O.D.)**
**Asst. Prof. Pravin Kurumkar**

# वाणिज्य विभाग

**श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित**
**श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा**

**श्री. वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाणिज्य विभाग सन २०१२ पासून सुरु करण्यात आला असून त्यांतर्गत वाणिज्य शाखेशी संबंधित सर्व विषयांचे अध्ययन व अध्यापन विविध तज्ञ प्राध्यांपकांव्दारे केले जाते. करिअर, सनदी लेखापाल, प्रबंधक, नेतृत्व गुण आणि विपणन क्षेत्रामधील विविध संस्था नेहमीच खुल्या आहेत.**

**प्रा.सचिन खंदारे** (विभाग प्रमुख)
**प्रा.सोनाली साळुंके**

# मराठी विभाग

**श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित**
**श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा**

महाविद्यालयाची स्थापना २०११-२०१२ मध्ये झाली शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ पासुन मराठी हा विषय सामान्य व विशेष स्तरावर शिकविला जातो या विभागा अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये विद्यार्थी उत्सफुर्तपणे सहभाग घेतात. ते कार्यक्रम पुढीलप्रमाणे.

*** शब्दामृत भित्तिपत्रकाचे उद्‌घाटन :-** संस्थेच्या सचिव सौ. मृणालताई फराटे पाटील मॅडम यांच्या शुभहस्ते मंगळवार दि. ०४/०९/२०१८ रोजी संपन्न झाले. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सावंत सर उपस्थित होते. सौ. मृणालताईंनी आपल्या मनोगतात आजचा विद्यार्थी जर आपल्या विचारांना नवी दिशा देवू शकला तरच तो उद्याचा उत्तम लेखक बनू शकतो व त्यासाठी भित्तीपत्रक हे प्रभावी माध्यम आहे असे सांगितले.

*** व्याख्यान :-** प्रा. दिनेश पवार यांनी सोमवार दि. ०८/०८/२०१८ रोजी व्यक्तिमत्व विकास व भाषिक कौशल्यांवर विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास कसा साधावा हे सांगितले.

*** वाचनप्रेरणा दिन :-** डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करतात. महाविद्यालयामध्ये शनिवार दि. १५/०९/२०१८ रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी व त्यातून स्वत:चा बौध्दिक विकास साधावा या हेतूने प्राचार्य डॉ. सावंत सरांनी विद्यार्थ्यांना बहुमोल असे मार्गदर्शन केले.

*** मराठी भाषा गौरव दिन :-** वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. बुधवार दि. ०७/०२/२०१९ रोजी आयोजित व्याख्यानात प्रा. डॉ. मधुकर मोकाशी सर यांनी मातृभाषेचे आपल्या जीवनात काय महत्व आहे हे विद्यार्थ्यांना अनेक उदाहरणातून पटवून दिले.

विद्यार्थ्यांना मराठी भाषेची ओळख व्हावी म्हणून महाविद्यालयात ५० गुणांची **''ओळख मराठीची''** लेखी परीक्षा घेण्यात आली.

**- प्रा.सौ. सुरेखा देशमुख (विभाग प्रमुख), प्रा. दत्तात्रय पवार**

# सांस्कृतिक विभाग

श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित

श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा

महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या बौध्दिक, मानसिक व शारिरीक विकासाला केंद्रस्थानी मानून कार्यक्रम घेण्यात आले. त्यामध्ये स्वच्छ व सुंदर भारत बेटी बचाव बेटी पढाव या अंतर्गत कन्यापूजन माता-पालक मेळावा इतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले व यशस्वीरित्या पार पडले ते कार्यक्रम पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | व्याख्याते | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | नवीन विद्यार्थी स्वागत समारंभ | प्रा.डॉ. टी.एस. सावंत | १७/७/२०१८ |
| २ | योगा दिन | प्रा. बी.एस. तावरे | २१/०७/२०१८ |
| ३ | राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन | प्रा.डॉ. टी.एस. सावंत | ०८/०८/२०१८ |
| ४ | स्वच्छता मोहीम | ........ | १४/०८/२०१८ |
| ५ | स्वातंत्र्य दिन (वृक्षारोवन) | श्री. ज्ञानेश्वर पाटील फराटे (उपाध्यक्ष ग्रा.वि.प्र.मांडवगण) | १५/०८/२०१८ |
| ६ | वक्तृत्व स्पर्धा (सांगली) | ........ | २१/०८/२०१८ |
| ७ | रक्षाबंधन | बी.के.वैशालीताई, बी.के. स्वातीताई | २७/०८/२०१८ |
| ८ | वाचन प्रेरणा दिन | डॉ.टी.एस.सावंत, प्रा.एस.व्ही. देशमुख | १५/०९/२०१८ |
| ९ | रक्तदान शिबीर | श्री. ज्ञानेश्वर पाटील फराटे उ.ग्रा.वि.प्र. मांडवगण फ. | १८/०९/२०१८ |
| १० | आपत्ती व्यवस्थापन | श्री. ए.ए. महाजन | १९/०९/२०१८ |
| ११ | महात्मा गांधी जयंती २४/९ ते २/१०/२०१८ | प्रा.डॉ. टी.एस. सावंत | २४/०९ ते ३०/०९/१८ |
| १२ | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती | प्रा. एस.ए. आटोळे | ०३/०१/२०१९ |
| १३ | राष्ट्रीय सेवा योजना शिबीर | प्रा.डॉ. संदिप सांगळे, आबा सोनवणे, मोहन परदेशी | ८/१ ते १४/१/२०१९ |
| १४ | स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन | मनोज वाबळे, प्रा. एस.ए.जाधव | ११/०१/२०१९ |
| १५ | प्रजासत्ताक दिन | ज्ञानेश्वर फराटे पाटील उ.ग्रा.वि.प्र. मांडवगण फ. | २६/०१/२०१९ |
| १६ | माता-पालक मेळावा | प्रा.डॉ. शिबीर गावडे,प्रा.डॉ. मनोज वाबळे,प्रा.डॉ. दिपाली जाधव | २९/०१/२०१९ |
| १७ | युवा महोत्सव उद्घाटन | उद्घाटक प्रा.डॉ.टी.एस. सावंत | २५/०२ ते २७/०२/२०१९ |
| १८ | मराठी भाषा गौरवदिन | प्रा. एम. जी मोकाशी | २७/०२/२०१९ |
| १९ | निरोप समारंभ | प्रा.डॉ.टी.एस. सावंत | ०९/०३/२०१९ |
| २० | पदवी ग्रहण व पारितोषिक वितरण समारंभ | प्रा. एम.जी. मोकाशी | ११/०३/२०१९ |

# पदवीग्रहण समारंभ अहवाल

दि. ०९ मार्च २०१९
ठिकाण : श्री. वसंतराव फराटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा
वेळ : ११ ते ०२
अध्यक्ष : श्री. राजीव फराटे पाटील

पदवीग्रहण समारंभ साजरा करण्यासाठी महाविद्यालयामध्ये ११ वाजता माजी विद्यार्थी, प्राध्यापक, पालक, प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव मृणाल फराटे मॅडम तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री. राजीव फराटे पाटील तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सावंत सर उपस्थित होते. महाविद्यालयाच्या परीक्षा अधिकारी प्रा. कुरूमकर डी.सी. उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मोकाशी सर उपस्थित होते.

या दरम्यान १४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. पितळे ए.पी. यांनी केले. व कार्यक्रमाचे आभार प्रा. देशमुख एस.व्ही. यांनी मानले.

# ग्रंथालय विभाग

**श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित**
**श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा**

ग्रंथालय अहवाल २०१८-१९

ग्रंथालय हे शिक्षण प्रक्रियेला पुरक व समांतर कार्य करीत असते. हे कार्य ग्रंथालयाच्या विविध विभागामार्फत चालू असते. त्यामध्ये ग्रंथ देवघेव विभाग, वर्तमानपत्र / नियतकालिक विभाग, अभ्यासिका ग्रंथ विभागांचा सहभाग असतो.

**अ) ग्रंथालयाची वैशिष्टये :-**

१) २००८-०९ मध्ये महाविद्यालयाच्या स्थापनेबरोबर ग्रंथालय स्थापन झाले
२) ग्रंथालयातील वाचनसाहित्य वापराबाबत सहकार्य करणे.
३) शिक्षण प्रक्रिया प्रभावी होण्यासाठी गुणवत्ता संपन्न ग्रंथसंग्रह विकसित करण्यात आला आहे.
४) सध्याच्या आणि भविष्यकालिन वाचकांच्या गरजा भागविण्यावर भर दिला आहे.

**ब) ग्रंथालयाचा वाचक वर्ग :-**

१) विद्यार्थी - ७२५
२) शिक्षक - २४
३) शिक्षकेत्तर कर्मचारी - ०६

**ड) ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या सेवा :-**

१) देवघेव सेवा
२) प्रचलित जागृकता सेवा
३) माहितीचे निवडक प्रसारण
४) संदर्भ सेवा
५) प्रतिलिपी सेवा

**क) ग्रंथालयातील वाचनसाहित्य :-**

१) ग्रंथ - २९४०
२) नियतकालिके - ०७

**इ) भविष्याकालिन योजना :-**

१) ग्रंथालय अज्ञावली चालू करणे
२) **N-List Consoriaum** उपलब्ध करणे
३) विविध ई-रिसोर्सेस विकसित करणे
४) डिजीटल लायब्ररी विकसित करणे
५) इंटरनेट सेवा उपलब्ध करणे
६) बुक बँक सेवा उपलब्ध करणे

**प्रा. चव्हाण अनंत प्रभाकर**
**ग्रंथपाल**

# परीक्षा विभाग

श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित

श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा

**Academic Year 2018-19** या वर्षाची सुरूवात १५ जुन २०१८ पासुन झाली महाविद्यालयामध्ये एकूण ५ कोर्स आहे. B.A., B.Com, BBA, BBA (C.A), B.Sc (C.S.) असे त्यामधील B.A., B.Com हे दोन कोर्स Annual Pattern ने चालतात. तसेच BBA, BBA(C.A.), B.Sc (C.S.) हे तीन कोर्स Semester पध्दतीने चालतात.

या पाचही कोर्सचे Exam Schedule Academic Year 2018-19 या दरम्यान खालील प्रमाणे झाले.

| | Cources | Inter Exam -I | University Exam | Term end Exam | Inter Exam -II | University Exam |
|---|---|---|---|---|---|---|
| Semester | BBA,BBA (C.A.) B.Sc.(C.S.) | 17/09/2018 to 19/09/2018 | 22/10/2018 to 03/11/2018 | | 28/02/2018 to 02/03/2018 | 12/03/2019 to 12/04/201 |
| Annual | B.A., B.com | ----- | ----- | 03/12/2018 to 11/12/2018 | | |

## University Semester Course चा Result खालीलप्रमाणे लागला.

| Cources | Date |
|---|---|
| BBA (C.A.) | 19/12/2018 |
| BBA | 20/12/2018 |
| B.Sc.(C.S.) | 08/12/2018 |

**अशा पद्धतीने Academic Year 2018-19 चा Exam चे Schedule वरील प्रमाणे होते.**

## Department of Computer Science

**श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित**

**श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा**

Asst. Prof. Kokare S.S.
Asst. Prof. Taware B.S.
Asst. Prof. Padale N.D.
Asst. Prof. Nale S.S.

The present institution has started, "Computer Science" in the year 2009-10. the present dept. has been will making the student competent in getting empoyment in the cor prate market. we have the assignment practical work in a advance computer lab for to be able to prove them as capable student. Also our department arranges the guest lectures, seminars, workshops and group discussions. the student are interesting participating in these programs. under the guidance of Mr. Rajiv Pharate Patil, Mrs. Mrunal Pharate Patil, Principal Dr. T.S. Sawant & Vice Principal Prof. Kokare S.S. the dept. is processing well. the dept gives the knowledge of competitive exams & give the in fn about P.G. Courses and also the various courses after graduation.

## विद्यार्थी विकास मंडळ

**श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित**

**श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा**

१) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये खालील प्रमाणे राबविण्यात आल्या आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना यामध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनींनी मिळून ३४ आहेत सदर योजनेमध्ये कार्यालयीन ग्रंथालय तसेच मैदानी काम करण्यात आले.

२) विशेष मार्गदर्शन योजना सदर या योजनेमध्ये सोबत जोडल्याप्रमाणे व्याख्याने आयोजित करण्यात आले व विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यात आले.

३) निर्भय कन्या अभिमान या योजनेची अंमलबजावणी जानेवारी/फेब्रुवारी महिन्यात राबविण्यात आले.

४) आपत्ती व्यवस्थापन या अभियानाची अंमलबजावणी माहे जानेवारी/ फेब्रुवारी मध्ये घेण्यात आले.
सदर माहिती सोबत जोडलेली आहे.

श्री. वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित श्री. वसंतराव फराटे पाटील महाविद्यालय मांडवगण फराटा, ता. शिरूर, जि. पुणे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विद्यार्थी कल्याण मंडळ अंतर्गत महाविद्यालयामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना महाविद्यालयामध्ये राबविण्यात येत आहेत.

श्री. वसंतराव फराटे पाटील महाविद्यालयामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत आर्थिक दुर्बल व ज्याची हलाखीची परिस्थीती आहे अशा विद्यार्थ्यांची विद्यार्थी सल्लागार समिती स्थापन करून त्याअंतर्गत ३४ विद्यार्थ्यांची निवड केली असून त्यांना संधी उपलब्ध करून दिली आहे. तसेच प्रतिमाह ४५ रू. मानधन अदा करण्यात येते व त्यांना कॉलेज कॅम्पस मध्ये ३ तासपर्यत कार्यालयीन काम करण्यास सांगितले जाते. तसेच महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व निर्भय कन्या अभियान योजना व विशेष मार्गदर्शन योजना राबविली जाते. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना इंग्रजी, अकाऊंट, अर्थशास्त्र या विषयाचे सखोल असे मार्गदर्शन या योजनेअंतर्गत दिले जाते. यात १०० ते १५० विद्यार्थ्यांचा सहभाग आहे.

अशा प्रकारे महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, विशेष मार्गदर्शन योजना, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व निर्भय कन्या अभिमान योजना या महाविद्यालयात राबविल्या जातात.

***

# निर्भय कन्या अभियान

**श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित**

**श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा**

आमच्या महाविद्यालयामध्ये दि. ०१/०२/२०१९ रोजी निर्भय कन्या अभियान अंतर्गत विद्यार्थीनींना मार्गदर्शन करण्यासाठी व विद्यार्थीमधील भिती नष्ट करण्यासाठी महाविद्यालयीन मुलीचे आरोग्य या विषयांवर मार्गदर्शन केले तसेच आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये महिलावर होणारे अत्याचार या संदर्भात व्याख्या त्यांनी मार्गदर्शन केले.

तसेच महाविद्यालयामधील छेडछाडीची प्रकरणे व मुलीमधील भयाचे वातावरण तसेच स्वत:चे संरक्षण कसे करावे यावरही मार्गदर्शन केले. तसेच हे मार्गदर्शन करत असताना युवतीनी आपल्या स्वत:च्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले. याविषयी डॉ. कल्पना पोखरना यांनी मार्गदर्शन केले.

# विद्यार्थी विकास मंडळ

श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित

श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा

## * आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण २०१८-१९ *

आमच्या महाविद्यालयात दिनांक १५/०२/२०१९ रोजी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण हा उपक्रम राबविण्यात आला सदर प्रशिक्षणामध्ये महाविद्यालयातील १०० ते १२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सदर प्रशिक्षणामध्ये **NDR** प्रमुख मेजर लालु रामयांनी मुलांना व मुलींना एखादी भुकंप, पूर, आग, औद्योगिक घटना असे काही घडल्यास यापासून आपली व इतर व्यक्तींची कशी मदत करून बाहेर पडता येईल याचे प्रशिक्षण देण्यात आले. मेजर लालू राम व त्यांचे इतर सहकार्याने अतिशय मोलाचे व महत्वाचे मार्गदर्शन व प्रशिक्षण विद्यार्थ्यांना व विद्यार्थीनींना देण्यात आले. महाविद्यालयामध्ये इतर तीन महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच त्यांनाही चांगल्या प्रकारची आपत्ती काळातील स्वत:ची मदत व इतरांची मदत कशी करायची याची माहिती व प्रशिक्षण मेजर लालु राम व त्यांचे सहकार्याने दिली.

आपत्ती काळातील भूकंप, पूर, आग तसेच औद्योगिक दुर्घटना या संदर्भात मेजर लालू राम व त्यांची टिम यांनी मोलाचे असे मार्गदर्शन केले व प्रशिक्षण व प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना देण्यात आले.

सदर कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य टि.एस. सावंत सर तसेच इतर प्राध्यापक उपस्थित होते. आपत्ती व्यवस्थापनाचा अहवाल व फोटो आपणास सादर करत आहोत.

***



# Alumni Meet

प्रा. अमोल पितळे (समन्वयक)

श्री. वसंतराव फराटे पाटील महाविद्यालय मांडवगण फराटा व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ माजी विद्यार्थी मेळावा समिती कार्यरत असून या विभागांतर्गत माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन केले. या विभागांतर्गत खालील प्रमाणे समिती स्थापन केली.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विभाग | पद |
|---|---|---|---|
| १ | प्रा. अमोल पितळे | BBA विभाग प्रमुख | अध्यक्ष |
| २ | प्रा. बाळासाहेब शिवाजी तावरे | BBA (C.A.) विभाग प्रमुख | सदस्य |
| ३ | प्रा. रोहिदास प्रकाश दिवटे | BA विभाग प्रमुख | सदस्य |
| ४ | प्रा. संदिप संपत कोकरे | B.Com विभाग प्रमुख | सदस्य |
| ५ | प्रा. सुरेखा विठ्ठल देशमुख | मराठी विभाग प्रमुख | सदस्य |

वरील प्रमाणे समिती गठन करून माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्याचे ठरविण्यात आले.

# माजी विद्यार्थी मेळावा

श्री. वसंतराव फराटे पाटील महाविद्यालयामध्ये दिनांक २२/०४/२०१९ वार सोमवार रोजी माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी १२ माजी विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव मा.सौ. मृणाल फराटे पाटील ह्या होत्या. तसेच प्रमुख उपस्थिती मध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुकाराम सावंत हे होते. यावेळी माजी विद्यार्थी बोलताना म्हणाले की, महाविद्यालयात व परिसरात खूप असा बदल झाला आहे. आम्हांला परत परत महाविद्यालयात यावे असे वाटते. तसेच यावेळी माजी विद्यार्थी संघटना स्थापन करण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील सर्व माजी विद्यार्थ्यांचा सहभाग चांगला होता. समिती खालीलप्रमाणे

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | अमोल नानासो रणदिवे | अध्यक्ष |
| २ | अजित रावसाहेब नागवडे | उपाध्यक्ष |
| ३ | सोहेल कासम सय्यद | सचिव |
| ४ | अब्रार मनान इनामदार | सदस्य |
| ५ | खलील इक्बाल सय्यद | सदस्य |
| ६ | अविनाश चंद्रकांत शिंदे | सदस्य |
| ७ | लक्ष्मण दशरथ समिंदर | सदस्य |
| ८ | मनिषा नानासाो कळसकर | सदस्य |
| ९ | हर्षदा लालासाो जगताप | सदस्य |
| १० | कोमल मिनिनाथ हासबे | सदस्य |
| ११ | प्रा. अमोल प्रविण पितळे | समन्वयक |

## Lifelong learning and Extension Department

श्री. वसंतराव फराटे पाटील महाविद्यालय मांडवगण फराटा व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ आजीवन अध्ययन व विस्तार विभाग कार्यरत असून या विभागांतर्गत विविध व्याख्यानांचे आयोजन केले जाते. या विभागांतर्गत विद्यार्थ्यांसाठी आपले जीवन अधिक चांगले करण्यासाठी व विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडवणे तसेच समाज व उच्चशिक्षण यामधील जवळीक वाढविणे व समाज विकास कार्यात विद्यापीठ, महाविद्यालयीन शिक्षक व विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, महिला सबलीकरण, विवाहपुर्व समुपदेशन या विषयावर व्याख्याने आयोजित केली. ते खालीलप्रमाणे – प्रा.जयराम पवार(समन्वयक)

| अ.क्र. | दिनांक | व्याख्यानाचा विषय | व्याख्याते | लाभार्थी विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | ११/०१/२०१९ | स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन | प्रा. मनोज वाबळे<br>प्रा. सुप्रिया जाधव | ९० |
| २ | १७/०१/२०१९ | विवाहपूर्व समुपदेशन | प्रा. संदिप तापकीर<br>प्रा. गणेश ढमे | १०५ |
| ३ | २९/०१/२०१९ | महिला सबलीकरण | प्रा. दिपाली जाधव<br>प्रा. शिरीष गावंडे | १२५ |

## Soft Skill Development Program

प्रा. जयराम पवार (समन्वयक)

श्री. वसंतराव फराटे पाटील महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांच्यासाठी महाविद्यालयात Soft Skill Development Program राबविण्यात आला या उपक्रमामध्ये विविध विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले. यामध्ये विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणी व त्या अडचणीवर कशाप्रकारे मात करता येईल या प्रकारचे व्याख्यानामधून विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच या विभागांतर्गत आताच्या स्पर्धेच्या युगात जर टिकून रहायचे असेल तर त्यासाठी ध्येय निश्चिती असणे गरजेचे असून त्यासाठी या विभागांतर्गत व्याख्यानाचे आयोजन केले तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकांनी सुध्दा वेळोवेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

| अ.क्र. | दिनांक | व्याख्यानाचा विषय | व्याख्याते | लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | २७ ऑगस्ट २०१८ | Time, Stress and Anger Management | Prof. Diwate R.P | 200 |
| २ | २८ ऑगस्ट २०१८ | Online Banking | Prof. Shinde A.B. | 220 |
| ३ | २९ ऑगस्ट २०१८ | Ethics and Honesty | Prof. Khandare S.B. | 200 |
| ४ | ३ सप्टेंबर २०१८ | Govt. Banking Scheme | Prof. Pitale A.P. | 250 |
| ५ | ४ सप्टेंबर २०१८ | Creating Effective Resume | Prof. Barge M.R. | 200 |

# क्रीडा विभाग

**श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित**

**श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत आमृतेश्वर कॉलेज विझर ता, वेल्हा या ठिकाणी दिनांक २४/०८/२०१८ ते २५/०८/२०१८ रोजी झालेल्या आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेसाठी आमच्या श्री. वसंतराव फराटे पाटील महाविद्यालयात एकूण ०४ विद्यार्थी खालीलप्रमाणे सहभागी झाले होते.

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग | प्रकार |
|---|---|---|---|
| १ | पवार मयूर बळीराम | S.Y.B.A. | ग्रीको रोमन-स्टाईल |
| २ | चौधुले अविनाश आण्णासाहेब | S.Y.B.Com | ग्रीको रोमन-स्टाईल |
| ३ | कुदळे मनोज विठ्ठल | S.Y.B.Com | ग्रीको रोमन-स्टाईल |
| ४ | चौधुले सागर रावसाहेब | S.Y.B.A. | ग्रीको रोमन-स्टाईल |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत एम.एस.के. कॉलेज सोमेश्वर नगर बारामती (ता.बारामती,जि. पुणे) या ठिकाणी झालेल्या आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेसाठी आमच्या श्री. वसंतराव फराटे पाटील महाविद्यालयातील एक विद्यार्थी खालीलप्रमाणे सहभागी झाले होते.

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग | वजन | प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | गुंड आदर्श दिनेश | S.Y.B.A. | ९७ किलो | फ्री-स्टाईल |

एम.एस.के. कॉलेज सोमेश्वर नगर बारामती (ता.बारामती,जि. पुणे) या ठिकाणी झालेल्या आंतरविभागीय स्पर्धेमध्ये गुंड आदर्श दिनेश याने प्रथम क्रमांक मिळवला. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत सनस ग्राऊंड पुणे या ठिकाणी दि. ०५/१०/२०१८ ते ०६/१०/२०१८ रोजी झालेल्या आंतरमहाविद्यालयीन ॲथलॅक्टीस स्पर्धेसाठी आमच्या श्री वसंतराव फराटे पाटील महाविद्यालयातील एक विद्यार्थी खालीलप्रमाणे सहभागी झाले होते.

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग | इवुन्त |
|---|---|---|---|
| १ | देवकर तुषार भरत | F.Y.B.A. | ४०० मि., १५०० मि., ५००० मि. |

**– प्रा.पाडळे एन.डी.**
क्रिडा विभाग समन्वयक

# PLACEMENT

The College believes that every student who joins the institution deserves to get a potential earning opportunity. Our vision and belief consolidates in our efforts to ensure that our students become self developed. To achieve this college runs the placement cell. The Placement Cell of the college organizes campus drive and also enables student to participate in pooled campus drives arranged by other colleges.

The notice regarding job opportunities and relevant information is displayed on the notice board. The names of selected students are displayed on the notice board.

## Placement Cell functions through the following process:

- **Screening of the employers and students.**
- **Selecting students for proper job profile.**
- **Arrangement of Interviews.**
- **Obtaining feedback from the employer and the students.**
- **Workshops and Exhibitions on Career Guidance.**
- **Maintaining Records.**
- **List of Placed Students:**

| Sr. No. | Student Name | Class | Company Name |
|---|---|---|---|
| 1 | Vedpathak Yogesh Subhas | TYBCS | C3IT Solutions Pvt. Ltd.,Pune |
| 2 | Khaldakar Sangita Navnath | TYBCA | Wagheshwar Gramvikas Pratishthan,Mandavgan Pharata |
| 3 | Rakshe Harashda Baban | TYBCA | Wagheshwar Gramvikas Pratishthan,Mandavgan Pharata |
| 4 | Kale Venu Rajendra | TYBCA | WNS Global Services Pvt. Ltd.,Pune |
| 5 | Kadam Sachin Ananda | TYBCA | Mahindra Logistics Ltd.,Pune |
| 6 | Gaikwad Kiran Dattatray | TYBCA | Prompt Personnel Consultancy Services Pvt.Ltd. |
| 7 | Kale Ganesh Pandurang | TYBCS | Shri Wagheshwar Dairy Foods & Agro Products Pvt. Ltd. |
| 8 | Shelar Samir Popat | TYBCA | SAJ Test Plant Pvt. Ltd.,Pune |
| 9 | Kalaskar Manisha Nanasaheb | TYBCA | Wagheshwar Gramvikas Pratishthan,Mandavgan Pharat |
| 10) | Tanpure Mangesh | TY BBA | ICICI Bank. |
| 11) | Salave Avinash | TY BBA | IDBI bank. |
| 12) | Yogesh Tilekar | TY BCA | ICICI Bank |
| 13) | Anil Balu Bhise | TY BCA | Definite Business Solutions |
| 14) | Bhosale Ajinkya Ashok | TYBCA | Bank of Maharashtra |
| 15) | Bhosale Umesh Soma | TYBCA | AXIS Bank |
| 16) | Pharate Harshada Pandit | TY BCA | TECH Mahindra |
| 17) | Dhawade Indrayani Mohan | TYBCA | TEC Mahindra |
| 18) | Pawar Shubhangi Kakaso | TY BCA | Infosis |
| 19) | Rakshe Harshada. | TY BCA | Wagheshwar Gramvikas Pratishthan |
| 20) | Khaladkar Sangita | TY BCA | Wagheshwar Gramvikas Pratishthan |
| 21) | Kumbhar Monika | TY BCS | Wagheshwar Gramvikas Pratishthan |
| 22) | Akash Vijay Kale | TY BBA | Reliance Jio Infocomm Ltd at Kurkumbh MIDC |
| 23) | Chatale Aba | TY BCS | Mango Apps Pvt.Ltd. |

**Asst.Prof. Taware B. S.**
Coordinator

# * वर्तमान पत्रातील वृत्तांकन *

लोकमत

## मांडवगण फराटा : नि:शुल्क रक्तगट तपासणीलाही प्रतिसाद

## शिबिरामध्ये १११ जणांचे रक्तदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**रांजणगाव सांडस :** मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, लोकनेते दादापाटील फराटे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, फराटे पाटील डिप्लोमा फार्मसी महाविद्यालय तसेच अहमदनगर ब्लड बँक यांच्या सयुंक्त विद्यमानाने रक्तदान शिबिर घेण्यात आले.

या शिबिरात नि:शुल्क रक्तगट तपासणी करण्यात आली. यात १११ जणांनी रक्तदान करून ५५० विद्यार्थ्यांनी रक्तगट तपासणी करून घेतली. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष राजीव फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे-पाटील यांनी केले. प्राचार्य डॉ. तुकाराम सावंत, प्राचार्य डॉ. मृणाल शिरसाट, प्राचार्य विवेक सातपुते, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम आधिकारी प्रा.अमोल पितळे, प्रा.जयराम पवार, अहमदनगर ब्लड बँकचे डॉ. पवार यांनी दीप प्रज्वलित करण्यात आले.

यावेळी शिबिरात राजीव फराटे पाटील म्हणाले, दरवर्षी विविध प्रकारच्या रुग्णांसाठी रक्ताची मागणी वाढत आहे. मात्र, त्यामानाने रक्तदाते कमी आहेत हे लक्षात घेऊन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाणे रक्तदान शिबिर आयोजित करुन सामाजिक बांधिलकीचा परिचय दिला.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम आधिकारी प्रा.अमोल पितळे, प्रा.जयराम पवार, प्रा. सुरेखा देशमुख, प्रा. सुप्रिया आटोळे, प्रा.अविनाश ढोबळे, प्रा.प्रीती ओल्लला, प्रा. सागर खर्डे, प्रा. अनिता नजन, विक्रम ढवळे, नवनाथ निकत, सागर कुदळे, आबा जाधव, विपुल खांडरे यांनी परिश्रम घेतले. या शिबिराच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विशाल कोपनर यांनी तर, आभार प्रा. जिवन राजगुरु यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 8 Sep 22, 2018
Powered by: erelego.com

पुणे आवृत्ती
बातम्यांचा राजा
जनप्रवास
वार्ताहर हनुमंत पंडित
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, उस्मानाबाद, अ. नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध. RNI NO. MAHMAR/2013/57952

## फराटे पाटील महाविद्यालयाने केरळ राज्यातीलपूरग्रस्तांना दिला मदतीचा हात



**मांडवगण फराटा । वार्ताहर**

मांडवगण फराटा ता, शिरूर(दि,११/९/२०१८) मंगळवारी येथील वसंतराव फराटे पाटील कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ , पुणे , राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने केरळ राज्याचे मदत व पुनर्वसन होण्यासाठी मदत गोळा करण्यासाठी प्रभातफेरी काढण्यात आली . केरळ राज्यात झालेल्या अतिपावसामुळे आलेल्या महापुराणे अतोनात नुकसान झाले . त्या केरळ राज्याला मदत करण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाणे आपली काहीतरी राष्ट्रीय आपुलकी व देशसेवा म्हणून सर्व शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी , विद्यार्थी यांनी मांडवगण फराटा गावात मदतफेरी काढली . सर्व राष्ट्रीय सेवा योजनांचे स्वयंसेवक यांनी हातात मदत बॉक्स घेवुन तसेच घोषवाक्य तयार करून घोषणा देत मदत गोळा केली . या मदतीत गावातील सामाजिक कार्यकर्ते , दुकानदार , नेतेमंडळी , छोटे व्यावसायिक , पादचारी , हॉटेल व्यवसायिक , विद्यार्थी यांनी हातभार लावला व एकुण अकरा हज़ार रुपये जमा झाले .

यावेळी जी पैशारूपी एकत्रीत जमा झालेली रक्कम कुलगुरू , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथे जमा करणार असल्याचे प्राचार्य डॉ . तुकाराम सावंत व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा . अमोल पितळे यांनी सांगितले .

## मांडवगण फराटा येथे १११ जणांचे रक्तदान



**मांडवगण फराटा,ता.२१ सप्टेंबर २०१८ (प्रतिनीधी) :** मांडवगण फराटा येथील वसंतराव फराटे पाटील कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लोकनेते श्री दादापाटील फराटे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय ,फराटे पाटील डीप्लोमा फार्मसी महाविद्यालय तसेच अहमदनगर ब्लड बँक यांच्या सयुंक्त विद्यमानाने भव्य रक्तदान शिबिर पार पडले.

या शिबिरात नि:शुल्क रक्टगट तपासणी करण्यात आली .यात 111 जणांनी रक्तदान करून 550 विद्यार्थ्यांनी रक्टगट तपासणी करून घेतली.या रक्तदान शिबिराचे उदघाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील यांनी केले. प्राचार्य डॉ.तुकाराम सावंत, प्राचार्य डॉ.मृनाल शिरसाट, प्राचार्य विवेक सातपुते, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम आधिकारी प्रा . अमोल पितळे, प्रा.जयराम पवार, अहमदनगर ब्लड बँकचे डॉ.पवार यांनी दिपज्योत प्रज्वलित करून सरस्वती पुजन केले.

यावेळी शिबिरात राजीव फराटे पाटील म्हणाले की, दरवर्षी विविध प्रकारच्या रुग्णांसाठी रक्ताची मागणी वाढत आहे. मात्र त्यामानाने रक्तदाते कमी आहेत हे लक्षात घेवुन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाणे रक्तदान शिबिर आयोजित करून सामाजिक बांधिलकीचा परिचय दिला. भविष्यात पण अशाप्रकारचे सामाजिक कार्य आमच्या संस्थेतर्फे केले जातील.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम आधिकारी प्रा.अमोल पितळे,प्रा.जयराम पवार, प्रा.सुरेखा देशमुख, प्रा. सुप्रिया आटोळे, प्रा.अविनाश ढोबळे, प्रा.प्रीती ओल्लला, प्रा.सागर खर्डे, प्रा.अनिता नजन,विक्रम ढवळे,नवनाथ निकत,सागर कुदळे, आबा जाधव, विपुल खांडरे यांनी परिश्रम घेतले.या शिबिराच्या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.विशाल कोपनर यांनी तर आभार प्रा.जिवन राजगुरु यांनी केले.

# वसंतराव फराटे पाटील महाविद्यालयात भूगोल दिन साजरा

**मांडवगण फराटा । वार्ताहर**

मांडवगण फराटा ता,शिरूर येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात १४ जानेवारी भूगोल दिन साजरा करण्यात आला.यादिवशी प्रा. मानसिंगराव गोडसे (माजी उपप्राचार्य टी. सी महाविद्यालय बारामती) यांचे आपत्ती व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.



प्रा. गोडसे सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती कशाप्रकारे घडून येतात.या बद्दल विविध उदाहरणे देऊन माहिती दिली. आणि आपत्ती आल्यानंतर त्या आपत्तीचे व्यवस्थापन योग्य प्रकारे करणे गरजेचे असते.असे सांगून विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापन प्रक्रियेत सहभाग नोंदवून मदत कार्य करावे. कोणत्याही आपत्तीचे व्यवस्थापन सुनियोजित पद्धतीने झाले पाहिजे आपत्ती व्यवस्थापन प्रक्रियेत वेळेचे नियोजन, जबाबदारीचे व्यवस्थापन,संदेशवहन व माहितीचे व्यवस्थापन इत्यादी घटक महत्वाचे असतात हे त्यांनी पटऊन सांगितले.

तसेच भूगोल दिनानिमित्त महाविद्यालयात पोस्टर प्रदर्शन, नकाशे व भौगोलिक साहित्य यांचे प्रदर्शन.. इ उपक्रम घेण्यात आले.

त्याचप्रमाणे भूगोल विभाग प्रमुख प्रा.जयराम पवार यांनी भूगोल विषयाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. पर्यावरणाचा विकास हा शाश्र्वत विकास डोळ्यासमोर ठेवला पाहिजे.या पुढील काळात महाविद्यालयीन अभ्यासक्रम ज्ञानाचे उपयोजना करणारे असावे असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. जयराम पवार यांनी केले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री राजीव वसंतराव फराटे पाटील, सचिव सौ. मृणालताई फराटे पाटील, उपाध्यक्ष श्री ज्ञानेश्र्वर फराटे पाटील, प्राचार्य डॉ. तुकाराम सावंत,प्रा.संदीप कोकरे, प्रा. रोहीदास दिवटे, प्रा. बाळासाहेब तावरे, प्रा. सुप्रिया आटोळे, प्रा. पुष्पाजली काटे, प्रा. दत्तात्रय पवार, प्रा. सचिन खंदारे,प्रा.प्रवीण कुरूमकर,प्रा. मेघा बर्गे,प्रा.सुप्रिया नाळे,प्रा.मनीषा कळसकर, प्रा.सूरज शिर्के,श्री सागर कुदळे, निखिल शिंदे,आकाश शेजवळ इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रंचालन प्रा. जयराम पवार यांनी केले व आभार प्रा.सुप्रिया जाधव यांनी मानले.

...राहुल कुल यांनी राहु

# वाढदिवसाचा खर्च टाळून पारधी मुलांना मदत



राजीव पाटील फराटे यांनी पारधी समाजातील लहान मुलांना शालेय साहित्याचे वाटप करताना.

**मांडवगण फराटा : वार्ताहर**

मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजीव पाटील फराटे व त्यांचे पुतणे अजय प्रतापराव फराट्टे पाटील यांनी आपल्या वाढदिवसाचा होणारा अनावश्यक खर्च टाळून श्रीगोंदा तालुक्यातील घुगल वडगाव येथील जानकीदेवी बजाज मुलींचे वसतिगृहातील वंचित पारधी समाजातील लहान मुलांसोबत वाढदिवस साजरा केला.

७० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व मिठाईचे वाटप करण्यात आले. याबाबत फराटे म्हणाले, वाढदिवसाला मोठ्या प्रमाणात अनावश्यक खर्च केला जात आहे. तो टाळून गरीब विद्यार्थ्यांना मदत करणे गरजेचे आहे. ज्या विद्यार्थ्याला शिक्षणाची आवड आहे, त्यांचा शैक्षणिक खर्चही करण्याची माझी तयारी आहे. या वेळी मांडवगण सहकारी दूध संस्थेचे अध्यक्ष सचिन फराटे, सा. ना. काळे, दत्ता कदम, हनुमंत फराटे, रामा इंगळे, गणेश काळे, सागर कुदळे आदी उपस्थित होते.

पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

जनप्रवास

वार्ताहर हनुमंत पंडित

मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अमरावती, अ. नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध. RNI NO. MAHMAR/2013/57952

# राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत स्वच्छता अभियान

**मांडवगण फराटा । वार्ताहर**

मांडवगण फराटा गावामध्ये वसंतराव फराटे पाटील कला,वाणिज्य, व विज्ञान शाखा व लोकनेते दादा पाटील फराटे कॉलेज ऑफ फार्मसी या कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक यांनी राष्ट्रीय स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छता पंधरवाडा साजरा केला, त्यानिमित्ताने यासर्वांनी संपूर्ण गाव स्वच्छ केले, ग्रामपंचायत परिसर ,वाघेश्वर मंदिर परिसर,शाळा, कॉलेज, बाजार तळ, प्राथमिक आरोग्य केंद्रअशा अनेक ठिकाणी हातात झाडू घेवून स्वच्छता अभियान राबविण्यात आले,अस्वच्छते मुळे साथीचे आजार कसे पसरतात व त्यावरील उपाय योजना या विषयी आरोग्य अधिकारी डॉ सातपुते मॅडम



यांनी मार्गदर्शन केले,राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा,सुप्रिया आटोळे यांनी ओला व सुका कचरा व्यवस्थापन कसे करायचे याविषयावर माहिती दिली ,यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा, राजीव पाटील, सचिव प्रा,सौ,मृणाल फराटे पाटील, संस्थापक उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील,प्राचार्य डॉ, तुकाराम सावंत ,प्राचार्य डॉ,मृणाल शिरसाठ राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा, अमोल पितळे, प्रा,सुप्रिया आटोळे,प्रा,जयराम पवार, प्रा,सुरेखा देशमुख, प्रा,सुप्रिया जाधव, प्रा,रेखा शिंदे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक ,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते,

प्रभात पुणे, मंगळवार, दि. २३ ऑक्टोबर २०१८



मांडवगण फराटा (ता.शिरूर) : येथील महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाचे धडे उपस्थितांना देण्यात आले.

## फराटे महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**मांडवगण फराटा –** येथील श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान संचालित श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, लोकनेते श्री दादापाटील फराटे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय तसेच आपत्ती व्यवस्थापन विभाग, पुणे जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या सयुंक्त विद्यमानाने महाविद्यालय सेमिनार हॉलमध्ये आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी उपस्थितांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे दिले. याचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष राजीव पाटील फराटे, संस्थापक सचिव मृणाल फराटे पाटील, संस्थापक उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील, प्राचार्य डॉ. तुकाराम सावंत, प्राचार्य डॉ. मृणाल शिरसाट, मुख्य प्रशिक्षक महाजन ए.ए., प्राचार्य विवेक सातपुते, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल पितळे, आजीवन अध्ययन समन्वयक प्रा.जयराम पवार, मराठी विभागप्रमुख प्रा. सुरेखा देशमुख यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्राचार्य मुख्य प्रशिक्षक महाजन यांनी आपत्ती व्यवस्थापन प्रात्यशिके करून दाखवली. यासाठी प्रा. अमोल पितळे, प्रा.जयराम पवार, प्रा.सुरेखा देशमुख, प्रा .दत्तात्रय पवार, प्रा.मोहिनी गायकवाड, प्रा.रेखा शिंदे, प्रा. पुष्पांजली काटे, प्रा. प्रवीण कुरुमकर, सागर कुदळे, रामभाऊ इंगळे, गणेश काळे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा.अमोल पितळे यांनी तर, आभार प्रा.जयराम पवार यांनी मानले.

पुढारी



मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री. वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नवरात्रोत्सवानिमित्त मातांनी केले कन्यापूजन.

# वसंतराव फराटे महाविद्यालयात मातांनी केले कन्यापूजन

**मांडवगण फराटा : वार्ताहर**

मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री. वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत नवरात्रोत्सवानिमित्त कन्यापूजनाच्या व दांडियाच्या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह मातांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन संस्थेने राबविलेल्या या उपक्रमाचे माता-भगिनींनी स्वागत केले. संस्थेच्या सचिव मृणाल फराटे म्हणाल्या, नवरात्रामध्ये महिषासुराचा वध करण्यासाठी देवीने नऊ अवतार घेतले. त्यांपैकी पाचव्या दिवशी देवीने कन्या रूपात युद्ध केले. म्हणून पाचव्या दिवशी कन्यापूजन कार्यक्रम घेण्यात येतो. 'महिला सबलीकरण' या विषयावर प्रा. उमा भोसले यांचे, तर 'महिलांचे आरोग्य व काळजी' या विषयावर स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. स्वाती लवंगारे यांचे व्याख्यान झाले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील, प्राचार्य डॉ. तुकाराम सावंत, प्राचार्य उमा भोसले, डॉ. स्वाती लवंगारे, मीनाक्षी धुमाळ यांच्या हस्ते झाले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमोल पितळे, सुरेखा देशमुख, जयराम पवार, सुप्रिया जाधव, मोहिनी गायकवाड, सुप्रिया आटोळे, मेघा बर्गे, डॉली शर्मा, पुष्पांजली काटे, रेखा शिंदे, प्रवीण कुरुमकर, सागर कुदळे, रामा इंगळे, निखिल शिंदे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेखा देशमुख यांनी केले, तर सुप्रिया जाधव यांनी आभार मानले.

Pune Gramin Edition
16 Oct, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

पुढारी



पदवीग्रहण विद्यार्थ्यांचा सन्मान करताना डॉ. मधुकर मोकाशी, राजीव फराटे पाटील, मृणाल फराटे. (छाया : राजेंद्र बहिरट)

## पदव्यांचा समाजासाठी उपयोग करा : डॉ. मोकाशी

**मांडवगण फराटा : वार्ताहर**

विद्यार्थ्यांनी नुसत्या पदव्या न घेता, त्या पदव्यांचा आपल्या राष्ट्र व समाजासाठी उपयोग करणे गरजेचे आहे. भारत हा युवकांचा देश आहे. तरी सद्य:स्थितीत विद्यापीठाने व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम बनविला पाहिजे, असे मत प्रा. डॉ. मधुकर मोकाशी यांनी व्यक्त केले.

मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या मार्गदर्शन तत्त्वानुसार पदवीग्रहण समारंभ आयोजित करण्यात आला होता.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील म्हणाले की, विद्यापीठाने हा कार्यक्रम महाविद्यालयस्तरावर होण्यास २०१५ पासून परवानगी दिली; तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये आई-वडील, तसेच शिक्षक यांनी जे कष्ट घेतले त्यांची जाणीव ठेऊन वाटचाल केली पाहिजे, असे सांगितले. उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे, विश्वस्त अर्चना कोंडे, डॉ. तुकाराम सावंत, परीक्षा अधिकारी धनाजी कुस्मकर, विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी संदीप कोकरे, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी अमोल पितळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन अमोल पितळे यांनी केले, तर सुरेखा देशमुख यांनी आभार मानले.

Pune Gramin Edition
14 Mar, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

पुढारी

## इनामगाव येथे रासेयोचे श्रमसंस्कार शिबिर

**मांडवगण फराटा : वार्ताहर**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे व वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय; लोकनेते श्री. दादापाटील औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने इनामगाव (ता. शिरूर) येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर पार पडले.

या सातदिवसीय शिबिरात व्याख्याने, महिला जनजागृती, अंगणवाडी सर्वेक्षण, रस्ता दुरुस्ती, वृक्षारोपण, प्राणायाम, हिमोग्लोबिन तपासणी, मूल्यशिक्षण आणि संस्कार, अंधश्रद्धा निर्मूलन, वनराई बंधारे, ग्रामस्वच्छता, पर्यावरण जागृती, रक्तदान शिबिर आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या शिबिराचे उद्घाटन सरपंच मंगल म्हस्के यांच्या हस्ते करण्यात आले, अध्यक्षस्थानी विजयसिंह मोकाशी होते.

संस्थापक अध्यक्ष राजीव पाटील फराटे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील, शरदचंद्र फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील, प्राचार्य तुकाराम सावंत, डॉ. मृणाल शिरसाट, डॉ. पद्माकर गोरे, उपसरपंच शीतल गांधले, तात्यासाहेब मचाले, श्रीनिवास घाडगे, बाळासाहेब घाडगे, राजेंद्र भालेराव, शहाजी घाडगे, संजय घाडगे, हमीद शेख, ज्ञानदेव शिंदे, शिवाजी मचाले, स्वाती शिंदे, तुकाराम मचाले, तात्यासाहेब घाडगे, संजय घाडगे, रूपेश घाडगे, हंबीरराव घाडगे, दिलीप निंबाळकर, सुभाष शिंदे, ग्रामसेवक बी. जी. घारे आदी यावेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी शिबिरात स्वयंस्फूर्तीने श्रमदान केले.

प्रा. अमोल पितळे यांनी सूत्रसंचालन केले, विवेक सातपुते यांनी आभार मानले.

Pune Gramin Edition
10 Jan, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

## पाटील महाविद्यालयात कन्यापूजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**रांजणगाव सांडस :** मांडवगण फराटे त शिरूर येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कन्यापूजन कार्यक्रमाला प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे संथापक-अध्यक्ष राजीव फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील, प्राचार्य डॉ. तुकाराम सावंत, प्रा. उमा भोसले, डॉ. स्वाती लवनगरे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. स्वाती लवगरे यांनी महिला आरोग्य व काळजी यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच, हळदी-कुंकू लावून उपस्थित कन्यांचे पूजन करण्यात आले.



नवरात्रोत्सवानिमित्त श्री वसंतराव फराटे पाटील महाविद्यालयात कन्यापूजन कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित मान्यवर.

Hello Pune Gramin
Page No. 4 Oct 16, 2018
Powered by: erelego.com

पुढारी

## १११ विद्यार्थ्यांनी केले रक्तदान

**मांडवगण फराटा :** येथील श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचालित श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १११ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले, तर ५५० जणांची रक्तपासणी करण्यात आली. लोकनेते श्री दादा पाटील फराटे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अहमदनगर ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील, प्राचार्य डॉ. तुकाराम सावंत, प्राचार्य डॉ. मृणाल शिरसाठ, प्राचार्य विवेक सातपुते, अमोल पितळे, जयराम पवार आदी उपस्थित होते. प्रविण चोळके, सुरेखा देशमुख, सुप्रिया आटोळे, अविनाश ढोबळे, प्रिती ओल्लला, सागर बर्डे, अनिता नजन, विक्रम ढवळे, नवनाथ निकत, सागर कुदळे, आबा जाधव, विपुल

My Gramin Edition
21 Sep, 2018 Page No. 2
Powered by : erelego.com

पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

वार्ताहर हनुमंत पंडित

मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, उस्मानाबाद, अ. नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध. RNI NO. MAHMAR/2013/57952

## मांडवगण फराटा येथे डॉ. अब्दुल कलाम जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन



**मांडवगण फराटा । वार्ताहर**

मांडवगण फराटा येथील श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृति जतन करण्याच्या अनुषंगाने त्यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव पाटील फराटे, संस्थापक सचिव सौ. मृणालताई फराटे पाटील, प्राचार्य डॉ. तुकाराम सावंत, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल पितळे, आजीवन अध्ययन समन्वयक प्रा. जयराम पवार, मराठी विभागप्रमुख प्रा. सुरेखा देशमुख यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमाप्रसंगी प्राचार्य डॉ. तुकाराम सावंत म्हणाले की, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे वैज्ञानिक क्षेत्रात महत्त्वाचे योगदान होते.

त्यांच्या या सर्व कार्याची दखल भारत सरकारने घेऊन त्यांना सर्वोच्च असा भारतरत्न पुरस्कार देण्यात आला. विद्यार्थ्यांनी जर विद्यार्थीदशेत पुस्तके वाचली तर ती भविष्यात टिकू शकतील म्हणजेच पुस्तके वाचाल तर वाचाल. यावेळी सत्काराला फेटा देऊन प्रमुख मान्यवरांना पुस्तके भेट देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी महाविद्यालयात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम वाचन कट्टा वाचनालयात सुरू करण्यात आला कारण वाचनाची आवड विद्यार्थ्यांना होऊन त्यांना प्रेरणा मिळावी.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. अमोल पितळे, प्रा. जयराम पवार, प्रा. सुरेखा देशमुख, प्रा. दत्तात्रय पवार, प्रा. मोहिनी गायकवाड, प्रा. रेखा शिंदे, प्रा. रोहिदास दिवटे, प्रा. पुष्पांजलि काटे, प्रा. प्रवीण कुलकर्णी, प्रा. डाली शर्मा, प्रा. सुप्रिया आटोळे, प्रा. सुप्रिया जाधव, प्रा. सचिन खांडरे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुरेखा देशमुख यांनी तर आभार प्रा. पुष्पांजलि काटे यांनी केले.

पुढारी



केरळ पूरग्रस्तांसाठी मदतनिधी जमा करताना स्वयंसेवक.

## फराटे विद्यालयाकडून पूरग्रस्तांसाठी मदत

**मांडवगण फराटा : वार्ताहर**

येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने केरळ पूरग्रस्तांसाठी मदत व पुनर्वसन होण्यासाठी मदत गोळा करण्यासाठी नुकतीच प्रभातफेरी काढण्यात आली.

केरळ येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेल्या महापुरामुळे अतोनात नुकसान झाले. त्यामुळे केरळ राज्याला मदत करण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आपली काहीतरी राष्ट्रीय आपुलकी व देशसेवा म्हणून सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांनी मांडवगण फराटा येथे मदतफेरी काढली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते, दुकानदार, नेतेमंडळी, छोटे व्यावसायिक, पादचारी, हॉटेल व्यवसायिक, विद्यार्थी यांनी हातभार लावला. यामध्ये एकुण अकरा हजार रुपये जमा झाले. यावेळी जमा झालेली आर्थिक रक्कम कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे जमा करणार असल्याचे प्राचार्य डॉ. तुकाराम सावंत, कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल पितळे यांनी सांगितले. मदतफेरी यशस्वी करण्यासाठी प्रा.जयराम पवार, प्रा. सुरेखा देशमुख, प्रा. सुप्रिया आटोळे, प्रा. डाल्ली शर्मा, सर्व स्वयंसेवक व विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.

My Gramin Edition
17 Sep, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

पुढारी



मांडवगण फराटा येथील वसंतराव फराटे पाटील महाविद्यालयात बोलताना सहायक पोलिस निरीक्षक बापूसाहेब पिंगळे व विद्यार्थी. (छाया : राजेंद्र बहिरट)

## गुणवत्ता असेल तर पैशांशिवाय यश शक्य : पिंगळे

**मांडवगण फराटा : वार्ताहर**

जिद्द आणि चिकाटी असेल तर यश हमखास मिळते. मी देखील अतिशय गरीब कुटुंबातून शिक्षण घेतले असून प्रसंगी शिक्षणासाठी आईचे गंठणही गहाण ठेवले होते. आता पैसे असूनही काही विद्यार्थ्यांना शिकता येत नाही. विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता असेल; तर तो पैशांशिवाय अपेक्षित यश संपादन करू शकतो, असे मत खडकवासला ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक बापूसाहेब पिंगळे यांनी व्यक्त केले.

मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील, प्राचार्य डॉ. तुकाराम सावंत, प्राचार्य डॉ. मृणाल शिरसाट, संदीप कोकरे, अमोल पितळे आदी उपस्थित होते. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी जयराम पवार, प्रवीण कुरूमकर, सुरेखा देशमुख, पुष्पांजली काटे, सुप्रिया आटोळे, प्रीती ओल्लला यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन रोहिदास दिवटे यांनी केले, तर संदीप कोकरे यांनी आभार मानले.

My Gramin Edition
29 Sep, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

पुढारी



मांडवगण फराटा येथे राबविण्यात आलेला स्वच्छ भारत पंधरवडा.

## मांडवगण फराटा येथे स्वच्छता पंधरवडा

**मांडवगण फराटा :** मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथे वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व लोकनेते श्री दादा पाटील फराटे कॉलेज ऑफ फार्मसीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वच्छ भारत पंधरवडा अभियान राबविण्यात आले. या अंतर्गत गावातील बसस्थानक, ग्रामपंचायत कार्यालय, वाघेश्वर मंदिर, जिल्हा परीषद प्राथमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र आदी ठिकाणची साफसफाई करण्यात आली. या प्रसंगी आरोग्य अधिकारी मंजूषा सातपुते, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव पाटील फराटे, मृणाल फराटे, ज्ञानेश्वर फराटे पाटील, सुप्रिया आटोळे, प्राचार्य तुकाराम सावंत, मृणाल शिरसाट, अमोल पितळे, जयराम पवार, सुरेखा देशमुख, डॅली शर्मा, सुप्रिया जाधव, अविनाश ढोबळे, अनिता नजन, सोनाली नगरे, रेखा शिंदे आदी उपस्थित होते.

Pune Gramin Edition
15 Aug, 2018 Page No. 2
Powered by : erelego.com

पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

वार्ताहर हनुमंत पंडित

मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, उस्मानाबाद, अ. नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध. RNI NO. MAHMAR/2013/57952

## राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत स्वच्छता अभियान



**मांडवगण फराटा । वार्ताहर**

मांडवगण फराटा गावामध्ये वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य, व विज्ञान शाखा व लोकनेते दादा पाटील फराटे कॉलेज ऑफ फार्मसी या कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक यांनी राष्ट्रीय स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छता पंधरवाडा साजरा केला, त्यानिमित्ताने यावर्षी संपूर्ण गाव स्वच्छ केले, ग्रामपंचायत परिसर, वाघेश्वर मंदिर परिसर, शाळा, कॉलेज, बाजार तळ, प्राथमिक आरोग्य केंद्र अशा अनेक ठिकाणी हातात झाडू घेऊन स्वच्छता अभियान राबविण्यात आले, अस्वच्छते मुळे साथीचे आजार कसे पसरतात व त्यावरील उपाय योजना या विषयी आरोग्य अधिकारी डॉ सातपुते मॅडम यांनी मार्गदर्शन केले, राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा. सुप्रिया आटोळे यांनी ओला व सुका कचरा व्यवस्थापन कसे करायचे याविषयावर माहिती दिली, यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. राजीव पाटील, सचिव प्रा. सौ. मृणाल फराटे पाटील, संस्थापक उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील, प्राचार्य डॉ. तुकाराम सावंत, प्राचार्य डॉ. मृणाल शिरसाट राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. अमोल पितळे, प्रा. सुप्रिया आटोळे, प्रा. जयराम पवार, प्रा. सुरेखा देशमुख, प्रा. सुप्रिया जाधव, प्रा. रेखा शिंदे त्यांच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते,

पुढारी

# फराटे महाविद्यालयात गणरायाला निरोप

**मांडवगण फराटा : वार्ताहर**

येथील श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचालित श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लोकनेते श्री दादा पाटील फराटे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय आणि डिप्लोमा फार्मसी महाविद्यालयामध्ये ९ दिवसांनंतर गणरायला वाजतगाजत निरोप देण्यात आला.

यात्रसंगी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष राजीव पाटील फराटे म्हणाले, विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर कलागुणांना वाव देणे गरजेचे आहे. यासाठी संस्थेच्या माध्यमातून गणेशोत्सव किंवा दहीहंडी वा इतर उत्सवाच्या माध्यमातून ते राबविण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील असतो.



**मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील वसंतराव फराटे महाविद्यालयामध्ये गणरायाला निरोप देण्यात आला. या वेळी संस्थेच्या अध्यक्षांसह शिक्षक, विद्यार्थी व इतर.**

या वेळी संस्थेचे सचिव मृणाल फराटे पाटील, प्राचार्य डॉ. तुकाराम सावंत, प्रा. डॉ. मृणाल शिरसाठ, विवेक सातपुते, विवेक भापकर, अमोल पितळे, जयराम पवार, प्रविण कुरूमकर, संदीप कोकरे, सचिन खंडारे, दत्तात्रय पवार, रोहिदास दिवटे, डॉली शर्मा, प्रविण चोळके, सुरेखा देशमुख, सुप्रिया आटोळे, राकेश वाणी, अविनाश ढोबळे, प्रीती ओल्लला, सागर खर्डे, अनिता नजन, योगिता टेमक, विशाल कोपनर, सोनाली नगरे, सुप्रिया जाधव, मोहीनी गायकवाड, रेखा शिंदे, मेघा बर्गे, पुष्पांजली काटे, जीवन राजगुरू, विक्रम ढवळे, नवनाथ निकत, सागर कुदळे, निनाद पाडळे आदी शिक्षक, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

My Gramin Edition
22 Sep, 2018 Page No. 2
Powered by : erelego.com

पुढारी

# शिबिरांमुळे मिळते शैक्षणिक, व्यावहारिक ज्ञान

## श्रीनिवास घाडगे यांचे मत; इनामगाव येथे रासेयो विद्यार्थ्यांचे श्रमसंस्कार शिबिर

**मांडवगण फराटा : वार्ताहर**

विद्यार्थ्यांनी शिबिरामध्ये केलेले काम उल्लेखनीय आहे. अशा शिबिरांमध्ये विद्यार्थ्यांबरोबर ग्रामस्थांचाही सहभाग असणे ही काळाची गरज आहे. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर इतरही व्यावहारिक ज्ञानाची माहिती मिळण्यास मदत होणार असल्याचे मत श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीनिवास घाडगे यांनी व्यक्त केले.



**इनामगाव (ता. शिरूर) येथे हिवाळी श्रमसंस्कार शिबिरामध्ये रक्तदान करताना ग्रामस्थ. (छाया : राजेंद्र बहिरट)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे व श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान संचालित श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व लोकनेते श्री दादा पाटील फराटे फार्मसी महाविद्यालय आणि राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या सहा दिवसांपासून इनामगाव (ता. शिरूर) येथे सुरू असलेल्या हिवाळी श्रमसंस्कार शिबिराची उत्साहात सांगता झाली.

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी इनामगाव येथील विविध भागांमधील परिसर स्वच्छ केला; तसेच गावामध्ये सर्व्हे करून स्थानिक ग्रामस्थांच्या आरोग्याबाबत माहिती घेतली. विद्यार्थ्यांनी गावातून स्त्री-भ्रूण हत्या रॅली काढून वृक्षारोपण केले; तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन या शिबिरामध्ये करण्यात आले. या वेळी श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजी पाटील फराटे, उपाध्यक्ष ज्ञानेश्व फराटे पाटील, सचिव मृणाली फराटे कॉलेजचे प्राचार्य डॉ. तुकाराम सावंत प्रा. डॉ. मृणाल शिरसाट, सरपं मंगलताई म्हस्के, बाळासाहेब घाडगे तात्यासाहेब घाडगे, स्वाती शिंदे तात्यासाहेब मचाले, भरत म्हस्के सूरज मचाले, नितीन गांधले, सखारा भालेराव, दिलीप निंबाळकर, शहाज घाडगे, हमीद शेख, ज्ञानदेव शिंदे तुकाराम मचाले, दादासाहेब घाडगे सखाराम भालेराव, ग्रामसेवक बी जी. घारे आदी ग्रामस्थ उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल पितळे यांनी, सूत्रसंचालन भाग्यश्री दिवेक यांनी; तर आभार अविनाश ढवळे यांनी मानले.

My Gramin Edition
15 Jan, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

पुणे आवृत्ती
बातम्यांचा राजा
जनप्रवास
वार्ताहर:हनुमंत पंडित
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, उस्मानाबाद, अ. नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.
RNI NO. MAHMAR/2013/57952

# इनामगावमध्ये संस्कार शिबीर संपन्न

**न्हावरे | वार्ताहर**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या मार्गदर्शनाखाली श्री वसंतराव फराटे पाटील कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि लोकनेते श्री दादापाटील फराटे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाणे इनामगाव (ता.शिरूर)येथे विशेष श्रमसंस्कार शिबीराचे उत्साहात उदघाटन करण्यात आले.



या शिबिराचे उदघाटक अर्जुन मचाले म्हणाले की, विद्यार्थ्यांना अशा शिबिरातून संस्कार मिळतात तेच संस्कार पुढील आयुष्यात उपयोगी पडतील. मुलांनी शिकून आपल्या गावचे, तालूक्याचे नाव उज्वल करावे. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष मंगल म्हस्के म्हणाल्या की , विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कार शिबिराचे महत्व समजले पाहिजे . अशा श्रमसंस्कार शिबिरातुन विध्यार्थी व्यक्तिमत्व विकास होत असतो. तसेच सर्वांनी अशा शिबिरात सहभाग घेतला पाहिजे .

यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल पितळे यांनी शिबीराची रुपरेषा स्पष्ट केली. या शिबिरामध्ये श्रमदानातून वृक्षारोपन, ग्रामस्वच्छता, वनराई बंधारे, रक्तदान शिबिर तसेच विशेष व्याख्यानमाला कार्यक्रम करणार आहेत. या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक राजीव फराटे पाटील, उपाध्यक्ष ज्ञानेश्र्वर फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील, अर्जुन मचाले, श्रीनिवास घाडगे, हमीद शेख, प्राचार्य सुभाष शिंदे, उपसरपंच शीतल गांधले, घारे भाऊसाहेब, शहाजी घाडगे, ह.भ.प. दत्तात्रय महाराज लाटे, तुकाराम मचाले, सर्जेराव भालेराव, सखाराम भालेराव, संजयराव घाडगे, रुपेश घाडगे, हंबिरराव घाडगे, भरत म्हस्के हे उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. तुकाराम सावंत, प्राचार्य डॉ. मृणाल शिरसाट, प्रा. संदीप कोकरे, प्रा. अविनाश ढोबळे, प्रा. जयराम पवार, प्रा. सुरेखा देशमुख, प्रा. सुप्रिया आटोळे, प्रा. अनिता नजन, प्रा. सागर खर्डे, या सर्वांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अमोल पितळे यांनी तर प्रास्तवीक प्रा. सुरेखा देशमुख यांनी केले तर आभार प्रा. विवेक सातपूते यांनी केले.

पुणे आवृत्ती
बातम्यांचा राजा
जनप्रवास
वार्ताहर:हनुमंत पंडित
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, उस्मानाबाद, अ. नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.
RNI NO. MAHMAR/2013/57952

# महाविद्यालयात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा बाबतीत मार्गदर्शन

**मांडवगण फराटे | वार्ताहर**

मांडवगण फराटा ता, शिरूर येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या विषयावर प्रा.मनोज बावळे व प्रा. सुप्रिया जाधव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.



प्रा.मनोज बावळे यांनी अंध विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम करून कसे यश संपादन केले.हे विविध उदाहरण देऊन सांगितले.तसेच विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त व नियोजन बद्ध अभ्यास करून देशाच्या प्रगती मध्ये हातभार लावावा.त्यासाठी त्यांनी विविध पदांवर अधिकारी व्हावे असे त्यांनी सांगितले.त्याचप्रमाणे प्रा. सुप्रिया जाधव यांनी सकारात्मक दृष्टीकोन, वेळेचं नियोजन ,स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना लागणारा आत्मविश्र्वास इतर बाबींचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे अधिकारी प्रा. जयराम पवार यांनी केले व विभागाची रूपरेषा विद्यार्थ्यांना सांगितली.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव वसंतराव फराटे पाटील,सचिव सौ. मृणालताई फराटे पाटील, उपाध्यक्ष ज्ञानेश्र्वर फराटे पाटील, प्राचार्य डॉ.तुकाराम सावंत, प्राचार्य. मृणाल शिरसाट, प्रा.संदीप कोकरे,प्रा. रोहीदास दिवटे, प्रा.बाळासाहेब तावरे,प्रा. सुप्रिया आटोळे, प्रा. पुष्पाजली काटे,प्रा. दत्तात्रय पवार,प्रा.सचिन खंदारे,प्रा.प्रवीण कुरुमकर,प्रा. मेघा वर्गे, प्रा.सुप्रिया नाळे, प्रा.मनीषा कळसकर, प्रा.सूरज शिर्के, श्री सागर कुदळे, निखिल शिंदे, आकाश शेजवळ इत्यादी उपस्थित होते.

या कार्यशाळेचे सूत्रसंचालन कु.ज्योती जाधव यांनी तर आभार प्रा. सुप्रिया आटोळे यांनी मानले.

पुणे आवृत्ती
बातम्यांचा राजा
जनप्रवास
प्रतिनिधी -हनुमंत पंडित
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, उस्मानाबाद, अ. नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.
RNI NO. MAHMAR/2013/57952

# महिलांचे सबलीकरण व सक्षमीकरण काळाची गरज : प्रा.डॉ.दीपाली जाधव



**मांडवगण फराटा । प्रतिनिधी**
श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने महिलांचे सबलीकरण व सक्षमीकरण या विषयावर प्रा. डॉ.दिपाली जाधव व प्रा. डॉ शिरीष गावडे,प्रा मनोज वावळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

डॉ दिपाली जाधव यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत च्या महिलांचा सक्षमीकरणाकडे जाणारा प्रवास विविध उदाहरणांच्या आधारे त्यांनी सांगितली.महिला विविध क्षेत्रामध्ये अत्यंत सक्षमतेने कार्य करतात.त्यांनी तळागाळातील महिलांसाठी कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिला स्त्रियांविषयी माहिती सांगितली तसेच डॉ शिरीष गावडे सरांनी महिलांसाठी असणारे कायदे या विषयी सविस्तर माहिती सांगितली व मनोज वावळे सरांनी मातृदेवोभव या विषयावर आईचे आपल्या जीवनातील महत्त्व सांगताना अनेक मातांची कार्ये सांगितले, महाभारतातील माता कुंती,मराठेशाहीत राजमाता जिजाऊ, या मातांमुळे इतिहास घडला, झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांच्या सारख्या पराक्रमी लढवय्या राणी मुळे महिलांचा पराक्रमी इतिहास घडला,पारतंत्र्यात सावित्रीबाई फुले यांच्या सारख्या शिक्षिका मुळे महिलांचे सबलीकरण व सक्षमीकरण झाले,

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे अधिकारी प्रा.जयराम पवार यांनी केले.व विभगाबदल सविस्तर माहिती दिली.यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील , उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील,सचिव मृणालताई फराटे पाटील,प्राचार्य तुकाराम सावंत,प्रा.अमोल पितळे,प्रा. अनंत चव्हाण,प्रा. सुरेखा देशमुख,प्रा. सुप्रिया जाधव, प्रा.सुप्रिया आटोळे,प्रा.सोनाली साळुंके, प्रा.रेश्मा बागल, प्रा.मनीषा कळसकर,प्रा.सुप्रिया नाळे ,प्रा.मेघा बर्गे,प्रा. पुष्पांजली काटे,प्रा.अनिता नजन, प्रा.संगीता शेंडे,प्रा.विद्या पाचर्णे,प्रा.सोनाली नगरे,प्रा. निलम मचाले,सागर कुदळे, निखिल शिंदे, आकाश शेजवळ,अनिल बुलाखे इ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सुरेखा देशमुख यांनी केले व आभार प्रा.सुप्रिया आटोळे यांनी मानले.

लोकमत

# फराटे महाविद्यालयाचे श्रमदान शिबिर उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**रांजणगाव सांडस :** इनामगाव (ता. शिरूर) येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, मांडवगण फराटा येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व लोकनेते श्री. दादा पाटील फराटे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिराचा उत्साहात समारोप झाला.

अध्यक्षस्थानी श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीनिवास घाडगे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून इनामगावच्या सरपंच मंगल

- आठ जानेवारीपासून सुरु झालेल्या या शिबिरामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. ग्रामस्वच्छता, वृक्षलागवड, बेटी बचाओ बेटी पढाओ, महिला जनजागृती, मूल्यशिक्षण आणि सामाजिक व आरोग्याच्या प्रश्नांवर जनजागृती आणि प्रबोधनात्मक उपक्रम या वेळी झाले.

संघटनेचे उपाध्यक्ष बाळासाहेब घाडगे, वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान संस्थेचे सचिव मृणाल फराटे, लोकनेते दादा पाटील फराटे, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य मृणाल शिरसाट उपस्थित होते. शिबिराच्या

त्याते ५१ बाटल्या संकलित झाल्या.

शिबिरामध्ये संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, तुकाराम मचाले, ज्ञानदेव शिंदे, तात्यासाहेब घाडगे, तात्यासाहेब मचाले, आप्पासाहेब मस्के, प्राचार्य सुभाष शिंदे, पवार सर, सूरज मचाले, सखाराम भालेराव, दिलीप अण्णा निंबाळकर, राहुल कांबळे, स्वाती शिंदे, लाटे महाराज, शहाजीदादा घाडगे, बबनराव घारे, हमीद शेख यांनी भेट दिली. शिबिरात प्रा. अमोल पितळे, प्रा. अविनाश ढोबळे, प्रा. सुरेखा देशमुख यांनी कार्यक्रम अधिकारी म्हणून काम पाहिले.

सूत्रसंचालन भाग्यश्री दिवेकर हिने केले, तर अमोल पितळे यांनी

Hello Pune Gramin
Page No. 10 Jan 17, 2019
Powered by: erelego.com

श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित,



## नियोजित महाविद्यालय इमारत

# श्री वसंतराव फराटे-पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

# मा.नामदार श्री. शरदचंद्र पवार पब्लिक स्कुल

मांडवगण फराटा, ता, शिरूर, जि. पुणे